राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

**राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धा सन 2023-24**

प्राथमिक शिक्षक गट

| शैक्षणिक नवोपक्रमाचे नाव |

# लक्षात ठेव मुला, हुश्शार व्हायचंय तुला !

....प्रवास प्रेरणेतून प्रज्ञाविकासाचा

| उपक्रम सादरकर्ते |

श्री. सचिन कुंडलिक देसाई (सहशिक्षक)
विद्या मंदिर बशाचामोळा
ता. भुदरगड जि. कोल्हापूर

SCAN / CLICK

# | शिक्षक माहिती



- **नवोपक्रम शीर्षक** : लक्षात ठेव मुला, हुश्शार व्हायचंय तुला !
  ....प्रवास प्रेरणेतून प्रज्ञाविकासाचा.
- **नवोपक्रमकर्त्याचे नाव :** श्री. सचिन कुंडलिक देसाई
- **कार्यालय** : विद्या मंदिर बशाचामोळा
  ता. भुदरगड जि. कोल्हापूर
- **पदनाम** : सहशिक्षक
- **नवोपक्रम गट** : प्राथमिक शिक्षक गट
- **शैक्षणिक अर्हता** : M.A.D.ed
- **जन्मतारीख** : १६ डिसेंबर १९८४ (एकूण वय ३९ वर्षे ० महिने)
- **सेवारंभ** : १० नोव्हे. २००५ (एकूण सेवा १८ वर्षे १ महिने)
- **शाळा रुजू दिनांक** : २९ जून २०१९ (एकूण सेवा ४ वर्षे ६महिने)
- **कायमचा पत्ता** : मु. पो. मिणचे खुर्द
  ता. भुदरगड जि.कोल्हापूर पिन-४१६२२३
- **संपर्क क्रमांक** : ९४२११९४२९०
- **ई-मेल** : skdesai011@gmail.com
- **ब्लॉग** : www.desaisachin.blogpot.in
- **नवोपक्रमसाठी लागलेला कालावधी** : ६ महिने
- **नवोपक्रम अहवाल एकूण पृष्ठ संख्या** : ४८

# प्रास्ताविक

या शिक्षण प्रक्रियेत अध्यापक म्हणून काम करताना, 'प्रभावी अध्ययन म्हणजे नेमके काय ?' या प्रश्नाचे उत्तर अनेक वेळा अनुभवाच्या आधारे शोधण्याचा प्रयत्न केला असता प्रत्येकवेळी 'प्रेरणा देणे' वा 'आव्हान देणे' हेच उत्तर मनामध्ये डोकाऊ लागते. आज प्रेरणेतून अध्ययनास प्रवृत्त करणारे अध्यापन हीच सर्वात आदर्श प्रणाली मानली जाते. अगदी माझ्या अनुभवावरून सांगायचे झाले तर, मागील दोन वर्षात माझ्या वर्गातील मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी जे काही प्रयत्न केलेत, जे काही नवोपक्रम राबवले, त्या सर्व नवोपक्रमांना शासनाचा राज्यस्तरीय सन्मान यापूर्वी प्राप्त झाला. याहूनही मला महत्वाचा वाटतो.....या समृद्ध अनुभवातून मला नव्याने कार्यप्रवृत्त करणारा सर्वात महत्त्वाचा नवविचार. **"मुलांच्यामध्ये कमी काळात अधिक परिणामकारकतेने, आनंददायी पद्धतीत बदल घडवायचा असेल तर यासाठी पूरक अशी प्रेरणादायी वातावरण निर्मिती आपणास करता आली पाहिजे."** याच मुलभूत व महत्वपूर्ण संकल्पनेवर आधारित हा नवोपक्रम मी या शैक्षणिक सत्रात निश्चित केला. ज्यामध्ये मुलांच्यामधील 'स्वयंप्रेरणा जागृती' व 'नवीन शिकवण्याची वृत्ती' वाढीस लावणे यास प्राधान्य देण्यात आले. याला अनुरूप उदिष्टांची निश्चिती झालेनंतर नवोपक्रम अंतर्गत पोषक विद्यार्थी कृती कार्यक्रम, उपक्रमाची व आव्हानांची निश्चिती करण्यात आली.

या नवोपक्रमाचे शीर्षक म्हणजे एक प्रकारे विद्यार्थ्यांना घातलेली साद आहे. ज्यातून मुलांच्याकडून नेमके काय अपेक्षित आहे ? याचा स्पष्ट बोध होतो. याशिवाय प्रत्येक मुलाने 'हुशार' होणेबाबत अपेक्षा व्यक्त केली आहे. यातील 'हुशार' याचा अर्थ केवळ अभ्यासात हुशार इतकाच मर्यादित नाही. मुलांनी विषयासोबत इतर सर्व क्षेत्रात प्राविण्य संपादन केले पाहिजे, १००% मुलांच्या १००% क्षमता व कौशल्ये विकसित झाली पाहिजेत असा व्यापक अर्थ आहे. यासोबत २१ व्या शतकाला सामारे जाताना त्यांच्यामध्ये आवश्यक असलेली कौशल्ये (6C) विद्यार्थ्यांच्या अंगी बाणली पाहिजेत, हा देखील या नवोपक्रमाचा मूलाधार आहे.

या शैक्षणिक वर्षात इयता ३ री व ४ थी या दोन जोडवर्गाचा वर्गशिक्षक म्हणून माझ्यावर जबाबदारी आली. शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये राज्यात सातत्याने अव्वल राहणाऱ्या कोल्हापूर जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हा परिषद शाळामध्ये शिक्षण विभागाकडून पूर्वतयारी म्हणून या दोन्ही वर्गासाठी विशेष प्रज्ञाशोध परीक्षाचे आयोजन केले जाते. या परीक्षेसाठी मुलांची विशेष तयारी करणे हे देखील आव्हान होते. यास्तव शिक्षणातील या महत्वपूर्ण टप्प्यात मुलांच्या प्रज्ञेचा परिपूर्ण विकास करण्यासाठी या कार्यक्रमाचा खूप चांगला लाभ झाला. कठीण विषयात सरलता निर्माण करत गोडी निर्माण करण्यात यश आले. प्रज्ञाशोध परीक्षा तयारी म्हणजे भरमसाठ प्रश्नपत्रिका सोडवून घेणे, विशिष्ट घटकांचीच तयारी, निव्वळ घोकंपट्टी व केवळ प्रज्ञावान मुलांच्याकडेच ज्यादातर लक्ष या प्रचलित व पारंपारिक पद्धतींना फाटा देत रंजक व रचनावादी पद्धतीनेही मुलांची सर्वांगीण तयारी घेता येऊ शकते, हे अनुभवातून सिद्ध झाले. या नवोपक्रम अंतर्गत शालेय स्पर्धा परीक्षाकरिता

विविध विषय घटकावर आधारित केलेले प्रयोग सर्वांच्यासाठी दिशादर्शक राहतील याचीही मला खात्री आहे.

प्रत्येक मूल हे जसे असामान्य असते तसे प्रत्येक मूल हुशारही असते, कदाचित प्रत्येकाच्या हुशारीचे क्षेत्र भिन्न असू शकते. त्याच्या हुशारीला न्याय देणारी आव्हाने वेगळी असू शकतात. **यातील 'हुश्शार' हा शब्द अनेक अर्थाने वापरला गेला आहे. जसा प्रत्येक विद्यार्थी 'स्मार्ट' झाला पाहिजे असा शब्द प्रयोग इंग्रजी मध्ये अनेक अर्थाने वापरला जातो अगदी तसाच 'हुश्शार' हा मराठी शब्द वापरला गेला आहे. आपला विद्यार्थी अभ्यासासोबत प्रत्येक क्षेत्रात निपुण झाला पाहिजे. विविध क्षेत्रातील माहिती जाणून घेण्याची त्याच्यात जिज्ञासा निर्माण झाली पाहिजे. या पायाभूत अवस्थेत जागतिक स्वीकार्यता असणारे मूल तयार करण्यासोबत भविष्यवेधी शिक्षण देण्यासाठी सदर नवोपक्रम लाभदायक ठरला याचा अत्यंत आनंद वाटतो.** सर्वात विशेष बाब म्हणजे या अंतर्गत आरोग्य व व्यक्तिमत्व विकास यावरही भर देण्यात आला. सदर नवोपक्रम म्हणजे एक प्रकारे सध्या राबवल्या जात असलेल्या 'अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन' या कार्यक्रमास पूरक असणारा उपक्रम आहे, असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. या दोन्ही कार्यक्रमाची उद्दिष्टे व आशय देखील समांतर व परस्पर पूरक असल्याचे पाहून आपण योग्य दिशेने वाटचाल केलेचा आत्मविश्वास निर्माण झाला.

विद्यार्थ्यांची स्वयंप्रेरणा जागृत करून खऱ्या अर्थाने परिपूर्ण विकास घडवणारा हा नवोपक्रम म्हणजे आनंददायी शिक्षणाची अनोखी प्रवास यात्रा होती. या प्रवासाच्या पाऊलखुणा नक्कीच सर्वांच्यासाठी दिशादर्शक राहतील हा विश्वास घेऊन आपणासमोर ही नावीन्यपूर्ण अभ्यासयात्रा मांडत आहे.

सचिन देसाई


# अनुक्रमणिका


| अ. क्र. | अहवाल लेखन घटक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ ) | नवोपक्रमाचे शीर्षक | १ |
| २ ) | नवोपक्रमाची गरज व महत्व | ४ |
| ३ ) | नवोपक्रमाची उद्दिष्टे | ५ |
| ४ ) | नवोपक्रमाचे नियोजन | ६ |
| ५ ) | नवोपक्रमाची कार्यपद्धती | १३ |
| ६ ) | नवोपक्रमाची यशस्विता / फलनिष्पती ( उद्दिष्टानुसार ) | २६ |
| ७ ) | समारोप | ३५ |
| ८ ) | संदर्भसूची व परिशिष्टे | ३६ ते ४८ |

## ▪ १. नवोपक्रमाचे शीर्षक

# लक्षात ठेव मुला, हुश्शार व्हायचंय तुला !

....प्रवास प्रेरणेतून प्रज्ञाविकासाचा



# ❑ २. नवोपक्रमाची गरज व महत्व

## ▪ उपक्रम निवडण्याचे कारण :-

प्राथमिक स्तरावरील प्रारंभिक दोन कक्षेत पायाभूत कौशल्यांची किमान तयारी झालेनंतर या NAS पातळीतील विद्यार्थ्यांनी अपेक्षित अध्ययन निष्पती साध्य करणे सोबतच शालेय स्पर्धा परीक्षेची पायाभूत तयारी करून घेणे, हे या टप्प्यातील आपल्यापुढे आव्हान असते. विशेष स्पर्धा परीक्षा तयारी बरोबर मुलांच्यामध्ये इतर आवश्यक कौशल्याबरोबर सर्वांगीण विकास करण्याच्या हेतू या शैक्षणिक कार्यक्रमाचे आयोजन करण्याचे ठरवले. प्रामुख्याने खालील कारणामुळे व शैक्षणिक गरजेतून नवोपक्रम हाती घेण्याचे ठरवले.

i. या शैक्षणिक वर्षात इयता ३ री व ४ थी हे दोन वर्ग माझेकडे होते. या दोन्ही वर्गातील मुलांना जिल्हा परिषद कोल्हापूर शिक्षण विभागामार्फत आयोजित प्रज्ञाशोध परीक्षेला सामोरे जायचे होते. यात अंतर्भूत असणाऱ्या घटकांची तयारी सरलतेने व रंजकतेने करून घेण्याच्या विचारातून या अभिनव नवोपक्रमाचा प्रथम विचार मनात आला. शालेय स्पर्धा परीक्षा बद्दल मुलांच्या मनात प्रथमतः या थोडीशी भीती होती, या भितीचे रुपांतर आवडीमध्ये करायचे होते.

ii. या स्तरावरील विद्यार्थ्यांची गणित व इंग्रजी या विषयाची तयारी होणे खूप आवश्यक असते. या कठीण वाटणाऱ्या विषयाबद्दल आवड व प्रभुत्व निर्माण करण्यासाठी रंजक वाटतील अशा नावीन्यपूर्ण अध्ययन पद्धतीचा विचार करणे आवश्यक होते. मुलांच्यामध्ये जिज्ञासा निर्माण होईल, शोधकवृत्तीस पोषक वातावरण निर्माण करण्यास विशेष प्रयत्न करणे आवश्यक वाटले.

iii. ८ ते १० या वयोगातील सर्व मुलांच्यामध्ये २१ व्या शतकातील निर्धारित केलेली सर्व कौशल्ये (6C) निर्माण करणे ही काळाची गरज बनली आहे. अशी कौशल्ये पारंपारिक पद्धतीने किंवा सामान्य वातावरणात होणे शक्य नव्हते, यासाठी उद्दिष्टे निश्चित करून विद्यार्थी कृती आधारित वैशिष्टपूर्ण कार्यक्रमाचे आयोजन करणे अत्यावश्यक वाटले.

iv. या अवस्थेमधील मुलांच्यामध्ये आरोग्य, आहार व शारीरिक स्पर्शज्ञान याबाबतचीही किमान सजगता निर्माण करणे गरजेचे होते.

v. १००% मुलांच्या १०० % क्षमता विकसित करण्यासाठी अनुकूल असे शैक्षणिक वातावरण तयार करणे आवश्यक वाटले.


vi. भविष्यकाळात स्पर्धा परीक्षेला सामारे जाण्याचे आव्हान सक्षमपणे पेलण्यासाठी या पायाभूत अवस्थेत बौद्धिक व मानसिक पूर्वतयारी घेणे आवश्यक वाटले.

vii. प्रभावी अध्ययन प्रक्रियासाठी विद्यार्थ्यांना आव्हान देणे खूप आवश्यक असते. असे आव्हान देण्याची संधी मुलांना वारंवार देण्यासाठी पूरक कार्यक्रम नियोजित व आयोजित करणे अत्यावश्यक वाटले.

viii. ग्रामीण भागात काम करत असताना बहुतांश वेळा शिक्षणाच्या अभावामुळे गणित व इंग्रजी अशा विषय तयारीसाठी पालकांचा अपेक्षित प्रतिसाद मिळत नाही. अशा वेळी मुलांना स्वावलंबी बनवण्याबरोबर शिकण्यासाठी आत्मनिर्भर करणे आवश्यक वाटते, यासाठी परिस्थितीनुरूप वेगळा प्रयत्न करणे आवश्यक वाटले.

ix. प्रज्ञाशोध परीक्षा, निपुण भारत, अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन व शिष्यवृत्ती परीक्षा पूर्व तयारी यासाठी समाविष्ट अभ्यासक्रम घटक आधारित विशेष प्रज्ञाविकास उपक्रम आवश्यक वाटला.

**उपक्रमाचे वेगळेपण :-** अध्ययन प्रक्रियेचा 'प्रेरणा' हाच मूलमंत्र मानून या शैक्षणिक नवोपक्रमाचा विचार करण्यात आला आहे. शिकण्याच्या प्रक्रियेमध्ये शिक्षकाच्या लादण्याच्या भूमिकेपेक्षाही विद्यार्थ्याची स्वीकारण्याची क्षमता वाढवणे खूप महत्वाचे असते. मुलांच्यामध्ये जिज्ञासा, कुतहूल, चिकित्सकपणा, कल्पकता यासारख्या गुणांची वाढ होईल, तेव्हाच खऱ्या अर्थाने परिपूर्ण अध्ययन सफल होते असे म्हणता येईल. या विचारातून प्रामुख्याने मुलाची स्वयंप्रेरणा जागृत करून विद्यार्थी विकास साधणारा हा नवोपक्रम आहे. मुलांची केवळ अभ्यासातील प्रगती न साधता सर्वांगीण विकासाच्या सर्व क्षेत्रांना स्पर्श करणारा हा नवोपक्रम आहे. शिक्षणात सकारत्मक बदल घडवण्यासाठी खऱ्या अर्थाने शिकणारे मूल सर्वात जास्त सकारात्मक असणे गरजेचे असते हा नवविचार प्रत्यक्ष कृतीतून सिद्ध करून दाखवण्यासाठी या नवोपक्रमाची मांडणी करण्यात आली आहे. या पूर्वी सार्वत्रिकपणे प्रज्ञाशोध परीक्षा अथवा शिष्यवृत्तीची पूर्वतयारी करण्यासाठी प्रचलित पद्धतीमध्ये घोकंपट्टी, अतिरिक्त अभ्यास वर्ग, प्रचंड प्रश्नपत्रिका सराव व शिक्षकप्रधान भूमिका आदी गोष्टीना प्राधान्य दिले जाते. याउलट **सृजनशीलता, स्वयंअध्ययन, तंत्रज्ञानातून अध्ययन सुलभता व विद्यार्थीप्रधान भूमिका यांना महत्व** देऊन आनंददायी वातावरणात कृतीशीलतेवर आधारित या नवोपक्रमाची मांडणी करण्यात आली, ज्यामुळे मुलांना व्यावसायिक शिक्षणाबद्दल जिज्ञासा व पायाभूत माहिती प्राप्त झाली.





- **उपक्रमाचे महत्व :-** नवोपक्रमाचे विशेष महत्व खालील बाबीवरून आपल्या लक्षात येईल.

- २१ व्या शतकातील आवश्यक कौशल्ये मुलांच्यात रुजवण्यासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे ठरत नाही. त्यासाठी पुस्काबाहेरील ज्ञानाची आणि कृतीची जोड देणे आवश्यक ठरत असते. या नवोपक्रमात समाविष्ट केलेल्या सर्व कृती अपेक्षित क्षमता पूर्ण करण्यास लाभदायक ठरणार आहेत. **चिकित्सक विचार (Critical Thinking), सर्जनशील विचार (Creative Thinking), सहयोग (Collaboration Skill), संवाद कौशल्य (Comunication Skill), आत्मविश्वास (Confidence), करूणा (Compassion) ही सर्व कौशल्ये मुलांच्यामध्ये निर्माण करण्यासाठी** हा नवोपक्रम एक प्रभावी मार्ग आहे.
- ८ ते १० वयोगातील मुलांच्यात **आरोग्य, पर्यावरण जाणीव, शारीरिक शोषण, बचत व तांत्रिक साधनांचा सुयोग्य वापर याबाबतची सजगता निर्माण करणे** आत्यावश्यक ठरत असते. या सर्व गोष्टीना यात महत्व देण्यात आले.
- शालेय अभ्यासक्रमातील **गणित, इंग्रजी या विषया सोबत इतर विषयाबाबत रूची व प्रविण्यता** संपादण्यासाठी पूरक अध्ययन कृतींची यामध्ये जोड देण्यात आली आहे.

- **भविष्यवेधी शिक्षणाची आवड व ओळख** करून देणारा हा उपक्रम प्राथमिक स्तरावरील प्रत्येक विद्यार्थ्यासाठी दिशादर्शक ठरणारा असा आहे.
- **शालेय व सहशालेय उपक्रमांचा एकत्रित समावेश करून समाजिक व राष्ट्रीय समस्यावर प्रभावी उपाययोजना** करण्याचे मार्ग या नवोपक्रमाच्या माध्यमातून शोधण्याचा प्रयत्न केला आहे.

नवोपक्रमातून विद्यार्थ्यांच्या मध्ये निर्माण होणाऱ्या 21 व्या शतकातील आवश्यक कौशल्ये



## ❑ ३. उपक्रमाची उद्दिष्टे

- आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांची स्वयंप्रेरणा जागृत करून त्यास नवीन ज्ञानप्राप्तीसाठी विविध आव्हाने देणे.
- प्राथमिक स्तरावरील प्रज्ञाशोध परीक्षेस सामोरे जाण्यासाठी निश्चित केलेल्या अभ्यासक्रम घटकांची तयारी सरलतेने होण्यास अध्ययनपूरक वातावरण निर्मिती करणे.
- गणित व इंग्रजी या कठीण वाटणाऱ्या विषयाबद्दल मुलांच्यामध्ये आवड निर्माण करून उच्चतम संपादणूक पातळी गाठणे.
- २१ व्या शतकातील कौशल्ये (6C) मुलांच्यामध्ये रुजवण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.
- बाल्यअवस्थेत असताना मुलांना वाचन, आरोग्य, शारीरिक शोषण, बचत व  पर्यावरण जाणीव या मुलभूत गोष्टीचे महत्व समजावे यासाठी पूरक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

## ❑ ४. उपक्रमाचे नियोजन

कोणत्याही कार्याचे सुयोग्य नियोजन अर्थात 'अर्धे यश' ठरत असते. उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी कार्यवाही करण्यापूर्वी त्याचे कालबद्ध नियोजन करण्यात आले. नियोजनामुळे पुढील दिशा आखणे सहज सुलभ झाले, शिवाय संभाव्य समस्या व अडचणीवर यशस्वी उपाययोजना करण्यात आली. संबधित घटकांशी चर्चा करण्यात आली.

**१) पूर्वस्थितीचे निरीक्षण-**

वर्गातील मुलांना इंग्रजी व गणित या विषयाबद्दल थोडी भीती असल्याचे जाणवत होती. ग्रामीण भागातील पालकांचे शिक्षण कमी असल्यामुळे बहुतांशी पालक मुलांची घरी असताना इंग्रजी सारख्या विषयाची तयारी करून घेण्यास समर्थता जाणवत होती. शालेय स्पर्धा परीक्षा याबाबतही फारशी जागृती पालाकांच्यामध्ये दिसून येत नव्हती. मोबाईलचा मनोरंजनासाठी पाल्यांच्याकडून चुकीचा वापर होत असल्याबाबत पालकांच्याकडून तक्रारी येत होत्या. वागणे, बोलणे व दैनदिन सवयी याबाबत काही मुलांच्या बाबतच्या तक्रारी पालक भेटीच्या वेळी लक्षात आल्या. निपुण भारत सारख्या कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी या शैक्षणिक सत्रात करणे आवश्यक होते. या सर्व बाबी विचारात घेऊन त्याच्या पूर्ततेसाठी नवोपक्रमाची रचना करण्यात आली. त्याची समस्यावर आधारित उद्दिष्टे ठरवण्यात आलीत. मुलांच्या अध्ययनस्तर व पूर्वज्ञाना बाबत मुल्यांकनाद्वारे उपक्रम पूर्वस्थितीत नोंदी ठेवण्यात आल्या. या नवोपक्रमसाठी कोणती शैक्षणिक साधने लागतील याचाही विचार करण्यात आला.

**२) पालकांशी संवाद तथा अनुभवी, तज्ञाशी पूर्वचर्चा-** उपक्रमाची निश्चिती झालेवर संभाव्य गरजा, समस्या लक्षात यशस्वितेसाठी काही अनुभवी व तज्ञ लोकांचे मार्गदर्शन घेण्यात आले.

- **पर्यवेक्षीय यंत्रणा -** डायट प्राचार्य मा.डॉ.आय.सी. शेख साहेब, जेष्ठ अधिव्याख्याता मा.डॉ.राजेंद्र भोई, अधिव्याख्याता मा.रमेश कोरे, मा.सरिता कुदळे, मा.राणीताई पाटील, शिक्षणाधिकारी मा.एकनाथ आंबोकर, मा.मीना शेंडकर, गटशिक्षणाधिकारी मा.दीपक मेंगाणे, विस्ताराधिकारी मा.उत्तमराव पाटील, मा.प्रबोध कांबळे, केंद्रप्रमुख श्री.आबासाहेब पसारे यांचे अनमोल मार्गदर्शन मिळाले.
- **नवोपक्रमशील शिक्षक –** उपक्रमशील शिक्षक श्री. खुर्शीद शेख, सौ.नलिनी बागुल, श्री.संभाजी पाटील, श्री.सुरेश शिंगणे यांचे मार्गदर्शन घेतले, याशिवाय सहकारी दिग्विजय कोटकर यांचे सहकार्य लाभले.
- **समिती, सामजिक संस्था व इतर -** शा.व्य.समिती, माता पालक संघ, महिला बचत गट, यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांचे विशेष सहकार्य लाभले. उपक्रम अंतर्गत निर्धारित कार्यवाहीसाठी कारागिरांचे, तांत्रिक लोकांची, वैदकीय अधिकारी यांचे मार्गदर्शन लाभदायक ठरले.

**३) आवश्यक साधनांचा विचार व उपलब्धता-** उपक्रमासाठी आवश्यक बाबींचा व साधनांचा पूर्वविचार करून त्याची यादी करण्यात आली. उपक्रम सुरु होण्यापूर्वी त्याची उपलब्धता करण्यात आली. विषयानुरूप प्रत्येक घटकाला कोणते शैक्षणिक साधन लागते याचा विचार करून काही साधने बनविण्यात आलीत. काही इतर साधने विकतही घ्यावी लागली. यातील काही प्रमुख साहित्य व साधने...

- मुलांच्यात यामधील स्वयंप्रेरणा व सकारत्मता जागृत करण्यासाठी **'प्रेरणादायी स्टिकर्स'** बवण्यात आले जे मुलांच्या बॉटल, वही, पुस्तक, कंपास याशिवाय घरी असताना मुल जिथे जिथे वावरते त्या ठिकाणी चिकटवण्यात आले.

- मुलांना दूरदर्शनची प्रचंड आवड असते, या विचारातून महाराष्ट्राचा व शिवरायांचा गौरवशाली इतिहास शिवरायांनी आवडीने शिकावा व समजून घ्यावा यासाठी टाकावू वस्तूपासून बनवलेला '**बिनविजेचा दूरदर्शन**' बनवून शिवरायांचा इतिहास अतिशय रंजक पद्धतीने शिकवण्यात मदत झाली. या उपकरणाची समग्र शिक्षा महाराष्ट्र ने देखील विशेष दखल घेतली.
- वनस्पती व इतर माहिती यांची QR कोड सहित बनवलेली भिंतीपत्रके माहितीपत्रके उपयुक्त ठरलीत.
- पर्यावरण जागृतीसाठी विशेष मोहीम या नवोपक्रम अंतर्गत करायची होती. या साठी मुलांची विशेष कार्यशाळा घेऊन त्यांच्या सहभागातून सीडबॉल निर्मिती करण्यात आली.
- मराठी, गणित तसेच बुद्धिमता या विषयातील महत्वपूर्ण घटकांच्या तयारीसाठी काही खेळ तयार करण्यात आले. खेळासाठी बनवलेली शब्द कार्ड्स, पुठ्ठे, घरातील टाकाऊ साहित्य, यांची उपलब्धता व जुळवणी करण्यात आली.
- आधुनिक कौशल्य विकसनासाठी रोबोटिक शिक्षणाची ओळख करून द्यायची होती. यासाठी लागणारे काही मटेरिअल ऑनलाईन खरेदी करावे लागले.
- प्रभावी व मनोरंजक अध्यानासाठी विशेष बोलक्या बाहुल्या लागत होत्या. अशा आकर्षक बोलक्या बाहुल्या उपलब्ध करण्यात आल्या.
- QR READER, PLANTIX, PLICKERS, NEWS BANNER MAKER यासारखी काही उपयुक्त APP वापरण्यात आलीत.
- ऑनलाईन टेस्ट, ई-साहित्य, रेकॉर्डिंग साठी आवश्यक साधने व इतर तांत्रिक साधने यांचीही उपलब्धता करण्यात आली.
- इंग्रजी शब्दसंग्रह व वाचन क्षमता सुधारण्यासाठी काही वैशिष्ठपूर्ण आकर्षक शैक्षणिक साधने तयार करण्यात आलीत.
- शाळा परिसरातील किंवा घरातील टाकाऊ वस्तूचा वापर कसा शैक्षणिक साधन म्हणून करता येईल ? या विचारातून काही कृती उपक्रम घेतले.
- वाचन प्रेरणादिनी दैनिक पुढारीचे अंक उपलब्ध करून मुलांच्याकडून वितरीत करण्यात आले
- क्वशन बँक साठी मोठ्या आकाराचे रिकामे खोके संग्रहित करण्यात आलेत.
- मिनी स्टुडंट बँक साठी काही रजिस्टरे खरेदी करण्यात आलीत.
- लिंग, आर्टिकल, वचन, शब्दांच्या जाती असे महत्वाचे घटक मनोरंजकतेने शिकवण्यासाठी वैशिष्टपूर्ण 'फायबर बकेट व प्लास्टिक डबे' असे साहित्य हि वापरण्यात आले.

**४) करावयाच्या कृतींचा निश्चित केलेला क्रम :**

1) वर्गातील विद्यार्थ्यांच्या अध्ययन प्रक्रियेत येणाऱ्या समस्यांचा व बौद्धिक, भावनिक व सामाजिक विकासातील उणीवांचा शोध घेणे.

2) अनुभवी नवोपक्रमशील शिक्षक, तज्ञ मार्गदर्शक व पालक यांच्याशी उपक्रम बाबत चर्चा करणे.

3) वर्गातील १००% विद्यार्थ्यांच्या १००% क्षमता व कौशल्ये विकसित करण्यासाठी पूरक कृती कार्यक्रमांचे नियोजन करणे.

4) पूर्वचाचणी आयोजित करून विद्यार्थ्यांची अध्ययन निष्पती, भावनिक विकास व सामाजिक बुद्धिमता यांचे मूल्यमापन करणे.

5) पूर्वचाचणीवर आधारित निष्कर्ष काढणे.

6) मुलांच्या सर्वांगीण विकासाच्या ध्येयप्राप्तीसाठी आवश्यक कृती-कार्यक्रम व उपक्रम निश्चित करणे..

7) पालक, शाळा समिती तथा उपक्रम संबधित आवश्यक स्थानिक घटक यांच्या सहकार्याने उपक्रमाची कार्यवाही करण्यात आली.

8) प्रत्यक्ष कार्यवाही करत असताना विद्यार्थी कृती, प्रतिसाद व कार्यवाहीत येणाऱ्या समस्या यांची वेळोवेळी नोंद ठेवण्यात आली.

9) समस्या निराकरण करण्यासाठी प्रभावी उपाययोजनांचा विचार करून प्रत्यक्ष अंमलबजावणी करण्यासाठी उपक्रम यशस्वी करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करणे.

10) उत्तर चाचणी आयोजित करुन त्यावर आधारित निष्कर्ष काढणे.

11) नवोपक्रमाची स्वानुभवातून उपयुक्तता जाणून त्याचे सार्वत्रीकरण करणे.

## ५) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण :

उपक्रम पूर्वस्थितीचे विद्यार्थी निरीक्षण व नोंदी ठेवल्या त्याचप्रमाणे उपक्रामोत्तर स्थितीचे निरीक्षण व नोंदी ठेवण्यात आल्या. नवोपक्रममुळे कोणता सकारात्मक बदल झाला ? विद्यार्थी क्षमतेत व विद्यार्थ्यांच्या कौशल्यात कोणते बदल दिसून आले ? याचे निरीक्षण केले. निश्चित केलेली उद्दिष्टे खऱ्या अर्थाने साध्य झालीत का ? २१ व्या शतकातील निर्धारित केलेली कौशल्ये खऱ्या अर्थाने प्राप्त झालीत का ? प्रज्ञाशोध परीक्षेसाठी निश्चित केलेल्या अभ्यासक्रम घटकांची तयारी झाली का ? मुलांना याबाबत आवड निर्माण झाली का ? या सारख्या सर्व बाबींचा पडताळा मुल्यांकनाद्वारे करण्यात आला.

- आरंभी कठीण वाटणाऱ्या मराठी व्याकरण व गणितीय संकल्पना यावरील सराव उदा. मुले आता आवडीने सोडवू लागलीत. योग्य प्रकारे उकल करू लागलीत.
- इंग्रजी वाचनाची भीती कमी झाली याउलट मुले आता इंग्रजी वाचनाच्या स्पर्धेत आवडीने भाग घेऊ लागली.
- मुलामध्ये नविनिर्मितीचा विचार करण्यामध्ये, सृजनशील कार्य करण्यामध्ये अभिरुची निर्माण झाली.
- शिक्षणात तंत्रज्ञानाचा उपयोग प्रभावीपणे करण्याचही कौशल्य, आवड विद्यार्थी व पालक यांच्यात वाढली. QR कोड चा वापर सहजतेने व सुलभतेने करण्यात विद्यार्थ्यांनी प्राविण्य संपादन केले.
- मुले परिसर अभ्यास विषय देखील आवडीने शिकू लागली. त्यावरील स्वाध्याय प्रश्न अचूकपणे सोडवू लागली.
- आत्मविश्वासाने आपले विचार मांडू लागली. परिसरातील माहितीचे संकलन करू लागली.
- शाळेच्या परिसरातील झाडांची काळजी घेऊ लागली.
- रोबोटिक बाबत ऑनलाइन माहिती शोधू लागली.
- मुलांच्या वर्तनात तसेच बोलण्यात व वागण्यात बरीच सकारात्मक सुधारणा झाली. मुले वडिलधाऱ्या माणसांशी आदराने वागू लागली. त्यांना कामात मदत करू लागली.
- परिसराचे ज्ञान, पर्यावरांची जपणूक या गोष्टीची जाणीव जागृती झाली. मुले घरच्या कामात पालकांना मदत करू लागली. या शिवाय शारीरिक शोषण याबाबत मुलांना पहिला बोध झाला.
- वर्गातील १००% विद्यार्थी प्रगत झालीत. स्वयंप्रेरणेने मुले समस्येची उकल करू लागली.
- विद्यार्थ्यांच्यामध्ये गुणात्मक व भावात्मक विकासा सोबत सर्वांगीण विकास साध्य झाला.
- मुले विचारलेल्या आव्हानात्मक प्रश्नाची उत्तरे देत स्वतः प्रश्न तयार करू लागली.
- प्रत्येक गोष्टीबद्दल प्रश्न विचारून माहिती घेण्याची वृत्ती वाढली.
- आपल्या आरोग्याची काळजी घेऊ लागली, शिवाय स्वच्छता ठेऊ लागली.
- मोबाईलचा वापर फक्त अभ्यासासाठी करण्याची सवय वाढली.
- मैदानी खेळाकडे मुले आकर्षित झाली. मुले मैदानी खेळासाठी रोजचा थोडा वेळ देऊ लागली.
- रानभाज्यांची माहिती आपल्या शब्दात सांगू लागली.
- मुलांच्या इंग्रजी शब्दसंपत्तीमध्ये वाढ झाली.
- मुलांची पुस्तक वाचनाची गोडी वाढली.
- मुलांच्यामध्ये बचत करण्याची सवय वाढली.

**६ ) कार्यवाहीचे टप्पे (वेळापत्रक )**

सदर नवोपक्रम अंतर्गत नाविन्यपूर्ण आनंददायी शिक्षण पद्धतीचा प्रारंभिक अवस्थेत अवलंब करुन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्यात आला. सदर उपक्रमाचे महत्वपूर्ण टप्पे / वेळापत्रक खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | कालावधी | उपक्रम अंतर्गत कृती |
|---|---|---|
| १ ) | जून २०२३ | विद्यार्थी **समस्या आढावा** घेणे, पालक व तज्ञांशी चर्चा करणे, उपक्रमाचे **नियोजन करणे, वरिष्टांचे मार्गदर्शन** घेणे, आवश्यक साधने, साहित्य व सुविधांची उपलब्धता करणे, **पूर्वचाचणी घेणे**, मुलांची विशेष पर्यावरण विषयक कार्यशाळा घेऊन **सीडबॉल निर्मिती** करणे. |
| २ ) | जुलै २०२३ ( प्रथम पक्ष ) | मुलांची स्वयंप्रेरणा व आत्मविश्वास जागृत करण्यासाठी **प्रेरणादायी स्टिकर्स** तयार करणे. सदर स्टिकर्स मुलांच्या रोजच्या वापरातील वस्तूवर चिकटवणे. तसेच मुलाच्या घरी जिथे मुले वावरतात अशा ठिकाणी चिकटवणे. **नवोपक्रमास आवश्यक शैक्षणिक साहित्य व कार्ड तयार करणे** त्यावर आधारित कृती व खेळ घेणे. परिसर अभ्यास २ आधारित शिवरायांच्या **इतिहासावर आधारित चित्रमाला** तयार करून हस्त निर्मित दूरदर्शनवर आकर्षक पद्धतीने दाखवण्याची मालिका सुरु करणे. |
| ३ ) | जुलै २०२३ ( द्वितीय पक्ष) | इंग्रजी विषयाच्या प्रत्येक घटकावर आधारित स्पीच रेकॉर्डिंग करून **'रीड विद मी'** हा उपक्रम सुरु करून वाचन कौशल्य सुधारणे. शब्दसंपत्ती वाढवण्यासाठी **'वर्ड चेन'** हा वर्गातील कागद कचरा वापर आधारित उपक्रम सुरु करणे. **बोलक्या बाहुल्यांची तसेच फिंगर पपेट** ची ओळख करून देऊन पाठावर आधारित नाट्यमय इ साहित्य रेकॉर्ड करणे.मनोरंजक **बकेट शो** खेळ घेणे. मुलांच्या सहभागाने **रानभाज्या महोत्सव** साजरा करणे. |
| ४ ) | ऑगस्ट २०२३ ( प्रथम पक्ष ) | मुलांना प्रश्न निर्मितीची ओळख करून देणे. शाळेत **क्वशन बँक ची सुरवात** करणे. मुलांनी तयार केलेले प्रश्न संग्रहित करून पुनः मुलांना सरावासाठी देणे. शाळेत **विशेष प्रश्नमंजुषा सप्ताह** आयोजित करून पहिली तासिकेला नियमित प्रश्नमंजुषा घेणे प्रत्येक, विद्यार्थ्याचा स्कोर कार्ड रिपोर्ट पालक ग्रुप वर प्रसारित करून यशस्वी गटाचे अभिनंदन करणे. **'स्मार्ट स्टुडन्ट इन स्मार्ट वॉच'** ही अभिनव कौतुक उपक्रम सुरु करून सर्वात यशस्वी मुलाचा फोटो शिक्षकाने आपल्या स्मार्ट वॉच डिस्प्ले वर ठेवण्याची प्रथा सुरु करणे. |
| २ ) | ऑगस्ट २०२३ ( द्वितीय पक्ष ) | जिज्ञासा, चिकित्सक वृत्ती वाढीस पोषक उपक्रम **'पझल चालेंज' करिता** साहित्यची निर्मिती वर्गात करण्यात आली. मुलांना विविध विषयातील आव्हाने देण्यात आलीत**. 'आपला आरोग्य मंत्र'** हा विशेष कार्यक्रम आयोजित करणे. ज्या अंतर्गत वैदकीय अधिकारी भेट, सकस आहार, सेंदीय खताची ओळख व आरोग्यदायी सवयी याबाबत जागृती करणे. |

| अ.क्र | कालावधी | उपक्रम अंतर्गत कृती |
|---|---|---|
| २ ) | सप्टेंबर २०२३<br>( प्रथम पक्ष ) | रोबोटिक शिक्षणाची प्राथमिक ओळख करून देणे, विद्यार्थ्यांना साहित्य जोडणीचे प्रशिक्षण देणे व प्रात्याक्षिके करून घेणे. मराठी व इंग्रजी वाचन वेग सुधारणारा **'रिडिंग रेस'** स्पर्धा आयोजित करणे. Stop Watch च्या मदतीने विद्यार्थी स्कोर कार्ड बनवून यशस्वी मुलांचे अभिनंदन करणे.<br>News Baner Maker app च्या मदतीने मुलांना परिसरात संग्रहित केलेली माहिती tab च्या मदतीने बातमी रुपात प्रदर्शित करणे. प्रज्ञा शोध परीक्षा आधारित ऑनलाईन अभ्यासमालिका सुरु करणे. |
| ३ ) | सप्टेंबर २०२३<br>( द्वितीय पक्ष ) | **'स्वतः शी बोलू काही'** या उपक्रम अंतर्गत मुलांना रोज स्वतःशी आरश्यासमोर बोलण्याची सवय लावणे. यावेळी दिवसभरात आपल्या कडून घडलेल्या चांगल्या किवा वाईट कृती मान्य करण्याची सूचना देणे. वाचनाची गोडी वाढवणारा अभिनव उपक्रम **'बुके नाही बुक-नोटबुक घेऊ हाती'** सुरु करून या अंतर्गत आनंदाच्या प्रसंगी शिक्षक अथवा विद्यार्थी कोणीही बुके न स्वीकारता बुक किंवा नोटबुक स्वीकारण्याचे अभिवचन घेतले जाईल व त्यातून समृद्ध असे बालवाचनालय उभारणे. |
| ४ ) | ऑक्टो.२०२३ | धान्यादी मालाची सहज पणे व परिपूर्ण ओळख व्हावी, यासाठी वर्गात विशिष्ठ रचना करण्यात येईल. मुलांना वर्गीकरण करण्यासाठी वर्गात सोय उपलब्ध करणे. मुले कृतियुक्त खेळातून धान्यादी मालाची ओळख करून घेतील. **धान्याचे उपयोग समजतील असे खेळ** सारणीच्या आधारे विद्यार्थीसमवेत घेणे. **मराठी भाषिक ज्ञानावर आधारित खेळ** तयार करण्यात आले. मनोरंजक पद्धतीमधून महत्वपूर्ण घटक पिल्लुदर्शक शब्द, घरदर्शक शब्द, ध्वनिदर्शक शब्द, समूहदर्शक शब्द, जोडशब्द, समानार्थी, विरुद्धार्थी, म्हणी या महत्वपूर्ण घटकांचा सराव घेण्यात आला. 'जागर स्वावलंबी शिक्षणाचा' अभिनव पद्धतीने साजरा करणे. |
| ५. | नोव्हें. २०२३ | **Good Touch & Bad Touch याची ओळख** मुलींना विशिष्ट कसोट्या वापरून करून देणे. यासाठी काही प्रात्यक्षिक कार्य पूर्ण करून घेणे. मुलांची **अंतिम चाचणी** घेऊन नवोपक्रमाची यशस्विता पडताळणे. |

## ६) उपक्रमासाठी इतरांची मदत :

**नवोक्रम अंतर्गत आवश्यक शैक्षणिक साहित्य निर्मितीसाठी** दिगंबर मालंडकर यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. प्रज्ञाशोध परीक्षा तयारीसाठी या विषयातील तज्ञ शिक्षक श्री. सुनिल देसाई, श्री.मारुती गोडसे, श्री. धनाजी केणे, श्री. एकनाथ पाटील यांचे मार्गदर्शन व सहकार्य प्राप्त झाले.

**७ ) उपक्रमासाठी सादर करावयाचे पुरावे :**

नवोपक्रम अहवाल लेखन करताना कोणते पुरावे सोबत जोडावे लागतील याचा पूर्वविचार करुन प्रत्येक टप्प्यावर त्याची जपणूक व संग्रह करुन अहवाल लेखनासोबत जोडण्यात आलेत. नवोपक्रमाची माहिती प्रभावीपणे मांडता आली.

i. नवोपक्रम संबधित महत्वाचे फोटो. ( अहवाल पान क्र २२ )
ii. नवोपक्रमाची संपूर्ण माहिती प्रात्यक्षिक स्वरुपात दाखवणाऱ्या व्हिडिओंची लिंक. ( पान १४ )
iii. नवोपक्रम अंतर्गत कृती कार्यक्रम तथा प्रकल्प संबंधित गुगल ड्राईव्ह वर अपलोड केलेल्या डोक्युमेंट फाईल फोल्डर ची लिंक (परिशिष्ट पान क्र. ३७ )
iv. पूरक ई-साहित्याची लिंक. (परिशिष्ट पान क्र. ३७)
v. संदर्भ म्हणून वापरलेल्या साहित्याची यादी. (परिशिष्ट पान ३६ )
vi. कृती कार्यक्रम यासाठी तयार केलेले वेळापत्रक व मासिक नियोजन यांचे नमुने (पान १० &११ )
vii. पूर्व चाचणी, उत्तर चाचणी याकरिता वर्तन बदल नोंद तक्ते व कसोटी नमुने. (परिशिष्ट पान ३६ )
viii. विद्यार्थी मूल्यमापन विश्लेषणात्मक तक्ते, आलेख. (पान २७ & ३० )
ix. नवोपक्रम अंतर्गत वापरलेल्या काही नाविन्यपूर्ण अध्ययन पद्धतीची यादी (पान २३)
x. उपक्रम पूर्ण झालेवर त्याची निरीक्षणे व नोंदी. (पान १४ )
xi. उपक्रमाचा आदर्श घेत असलेल्या शाळांची यादी, नवोपक्रमबाबत शिक्षक प्रतिक्रिया व अभिप्राय. (पान ३२ ते ३४ )
i. नवोपक्रम अंतर्गत घेतलेल्या महत्वाच्या उपक्रमांची/ कृती कार्यक्रमांची यादी. (पान १५ ते २१ )

नवोपक्रम संबंधित सर्व व्हिडिओ संग्रह :
https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnxUdEMK5SWbVvSAwV_6stfv

SCAN / CLICK

## ❑ ५. उपक्रमाची कार्यपद्धती

- **उपक्रम पूर्व स्थितीचे निरीक्षणे व त्यांच्या नोंदी :-**

या शैक्षणिक वर्षात इयत्ता 3 री व ४ थी चा वर्गशिक्षक म्हणून जबाबदारी स्विकारल्यानंतर दोन्ही वर्गातील १८ विद्यार्थ्यांची प्रज्ञाशोध परीक्षा तयारी करण्यासोबत २१ व्या शतकातील कौशल्ये विकसित करण्यासाठी ‘लक्षात ठेव मुला हुश्शार व्हायचंय तुला !’ ह्या नवोपक्रमाचे नियोजन करण्यात आले. इंग्रजी, गणित व बुद्धिमता या महत्वपूर्ण विषयासह सर्व क्षेत्र विकासाचा अंतर्भाव विविध उपक्रमांच्या निश्चिती मधून करण्यात आला. पूर्वस्थितीचे निरीक्षण करत असताना खालील बाबींचे निरीक्षण शाळेत केले. गृह्भेटीच्या वेळीही पालकांना माहिती विचारून त्याच्या नोंदी ठेवण्यात आल्या.

- इंगजी वाचन करता येणारी एकूण मुले किती आहेत ?
- मराठी व्याकरणावर आधारित प्रश्नात चुका करणारी मुलांची संख्या किती ?
- समानार्थी व विरुद्धार्थी शब्द ज्ञात असणारी मुले किती ?
- घरदर्शक, पिल्लुदर्शक, ध्वनीदर्शक व समूह्दर्शक या आधारित अचूक उत्तरे देणारी मुले.
- गणितामधील अपूर्णांकावर आधारित उदा. अचूकपणे सोडवणारी व चुकणारी मुले.
- शाब्दिक गणिती उदाहरणे सोडवताना गोंधळणारी मुले.
- कालमापन वरील उदाहरणे अचूकपणे सोडवणारी मुले
- बुद्धिमता मधील कुटप्रश्न आवडीने सोडवणारी मुले.
- १०० हून अधिक इंग्रजी शब्द संग्रह असणारी मुले.
- घरी असताना मोबाईलचा अभ्यासाव्यतिरिक्त अतिवापर करणारी मुले.
- धान्यादी मालाची पुरेसी ओळख व माहिती नसणारी मुले
- रोबोटिक बाबत माहिती असणारी मुले किती आहेत ?
- बालवाचनालयातील पुस्तके वाचनासाठी घेणाऱ्या मुलांची संख्या.
- आपल्या परिसरात असणाऱ्या पिकांची नावे माहिती असलेले विद्यार्थी.
- घरातील व्यक्तींच्याबरोबर उद्धटपणे वागणारी किंवा तशी तक्रार आलेली मुले किती आहेत ?
- स्वतः प्रश्न तयार करता येणारी मुलांची संख्या किती आहे ?
- बोलताना भीती बाळगणारी किंवा आत्मविश्वास कमी असलेली मुले किती आहेत ?
- रानभाज्या विषयी माहिती असणारी मुले.
- Good Touch & Bad Touch बाबत माहिति असणाऱ्या मुली, मुले किती आहेत ?

वरील मुद्द्यांच्या आधारे निरीक्षण करून अपेक्षित वर्तन बदल सध्य करण्यासाठी त्याअनुषंगाने कृती उपक्रमांची निश्चिती व कार्यवाही करण्यात आली. **सदर नवोपक्रमाचा जन्म एका छोट्याशा कृती उपक्रमातून झाला.** गतवर्षी इयत्ता २ री विशेष नवोपक्रम ‘दुसरे पाऊल आनंदी शिक्षणाची चाहूल’ हा उपक्रम राबवत असताना एक वैशिष्टपूर्ण शैक्षणिक साहित्य बनवले होते ते म्हणजे ‘शिक्के शाबासकीचे’ याचा वापर मुलांचा स्वाध्याय अगर वर्गकार्य तपासल्यानंतर मुलांना प्रबलन देण्यासाठी होत असे. ज्याद्वारे मुलांना अतिशय छान, खूप सुंदर, Very Nice व स्टार देण्यात येत होते. या छोट्याशा कृतीतून मुलांच्यात प्रचंड प्रमाणात उत्साह आणि बदल पहावयास मिळाला. ‘प्रेरणा’ ही बाब विद्थ्यार्थी वर्तन बदलास किती लाभदायक ठरू शकते ? याचा अनुभव मिळाला, याच विचारातून ‘प्रेरणा’ या मुलतत्वावर आधारित या नवोपक्रमाची संकल्पना प्रत्यक्षात आमलात आली.

नियोजनाप्रमाणे नवोपक्रमाच्या कार्यवाहीमध्ये खालील कृती-कार्यक्रम तथा प्रकल्पांचा समावेश करण्यात आला.

**कृती क्र.१. प्रेरणादायी स्टीकर्स**

आपण मुलांशी कसे बोलतो ? कसे संबोधित करतो ? यावर त्यांची 'स्व' ची जाणीव निर्माण होत असते. ही जाणीव सकारात्मक असणे अतिशय आवश्यक असते. यासाठी सर्वप्रथम एक अभिनव प्रयोग केला. मुलांना प्रबलन मिळेल असे काही विशेष प्रेरणादायी स्टिकर्स बनवून ते मुलांच्या दैनंदिन वापरातील वस्तूवर चिकटवण्यात आले. यामध्ये पाण्याची बॉटल, वही, पुस्तक, कंपास, तगड अशा साहित्याचा वापर करण्यात आला. या वस्तूवर **'मी हुशार आहे' 'मी खूप प्रामाणिक आहे' 'मला आता गणिते सोडवायला खूप आवडतात' 'मी आता खूप आवडीने इंग्रजी वाचतो.' 'मला स्वच्छ रहायला खूप आवडते' 'मला झाडांची काळजी घ्यायला खूप आवडते' 'मी कधीही खोटे बोलत नाही' 'मी खूप जिद्दी मुलगा आहे' 'मला दुसऱ्याला मदत करायला आवडते' 'मी सर्वांचा आवडता होण्याचा नेहमी प्रयत्न करतो'** यासारखी स्टीकर्स बनवण्यात आलीत. या शिवाय काही स्टिकर्स घरी मुले जिथे आपले साहित्य ठेवतात. अशा ठिकाणी देखील लावण्यात आलीत. यामुळे ही प्रेरक विधाने मुलांच्या नेहमी नजरेस पडू लागली, यातून मुलांच्या मध्ये एक वेगळा आत्मविश्वास व 'स्व' ची जाणीव निर्माण झाली. यासोबत प्रत्येक मुलामध्ये स्वतःबद्दल आदरभाव निर्माण झाला.



**व्हिडिओ लिंक :** https://youtu.be/LrUybLXRUMA?si=fXe0QVJlkM-k70Ip

**साध्य उद्दिष्ट :** आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांची स्वयंप्रेरणा जागृत करून त्यास नवीन ज्ञानप्राप्तीसाठी आव्हाने देणे.

**कृती क्र.२. My Question Bank**

आपण नेहमी मुलांना प्रश्न सोडवण्यास सांगत असतो. यापेक्षा वेगळा प्रयत्न या नवोपक्रम अंतर्गत सुरु करण्यात आला. मुलांना प्रश्न प्रकारांची ओळख करून देऊन प्रश्ननिर्मिती कशी करायची ? याबाबत छोट्या कार्यशाळेतून मार्गदर्शन करण्यात आले. यानंतर विषयनिहाय पाठ्यक्रमातील घटकांची विभागणी करून प्रत्येक विद्यार्थ्यास वेगवेगळे घटक देऊन त्यावर आधारित प्रश्न तयार करण्याची जबाबदारी देण्यात आली. मुलांनी तयार केलेले प्रश्न जमा करण्यासाठी वर्गात विषयनिहाय बॉक्स ठेवण्यात आले त्यामध्ये तयार केलेले प्रश्न टाकण्याची सूचना करण्यात आली. सोमवार ते शुक्रवार या पाच दिवसात मुले स्वतः तयार केलेले प्रश्न या प्रश्नपेढीत टाकू लागली. शनिवारी ही प्रश्नपेढी शिक्षकाकडून उघडली जायची. त्यातील चुकीचे प्रश्न वगळून अचूक प्रश्न एकत्र केले जायचे व ते मुलांना पुढील रविवारी सुट्टीच्या दिवशी सराव म्हणून घरी सोडवण्यासाठी दिले जायचे. यातून मुलांना प्रश्न निर्मितीचे व प्रश्न सोडवण्याचेही कौशल्य प्राप्त झाले.




**व्हिडिओ लिंक :** https://youtu.be/q__QwaerWjs?si=cGgYYW34e6q6oBYt

**साध्य उद्दिष्ट :** प्राथमिक स्तरावरील प्रज्ञाशोध परीक्षेस सामोरे जाण्यासाठी निश्चित केलेल्या अभ्यासक्रम घटकांची तयारी सरलतेने होण्यास वातावरण निर्मिती करणे.

**कृती क्र.३. 'Read With Me- वाचू संगे संगे'**

मुलांचे मराठी वाचन तयारी चांगली होती पण काही मुलांना इंग्रजी वाचनाची भीती वाटत होती. यासाठी इंग्रजी वाचनाचा अधिक सराव घेणे गरजेचे होते. ग्रामीण भागातील या मुलांचे पालक अधिक शिकले नसल्याने इंग्रजी वाचनाचा सराव घरी होण्यास काही मर्यादा येत होत्या. यावर उपाय म्हणून इंग्रजी विषय घटकनिहाय स्वतः योग्य उच्चारात ऑडीओ फाईल बनवल्या. त्या फाईल पालकांच्या मोबाईलवर सेंड करणे सुरु केले. मुलांना ही ऑडीओ फाईल कशी प्ले करायची ? याची ओळख करून दिली गेली. आता मुले घरी गेल्यावर स्मार्ट फोनवर Whats App वर आलेली ऑडीओ फाईल ऐकून वाचनाचा पुनः पुनः सराव करू लागली. एखादा शब्द वाचनात अडचण येत असेल तर ऑडीओ चा वापर करू लागली. **एक प्रकारे Listen & Repeat ही activity मुले शिक्षक समोर नसतानाही घरी सहजपणे करू शकत होती ते अगदी आनंदाने !**

(गुगल ड्राईव्ह) लिंक :

https://drive.google.com/drive/folders/1YKa4WmZ27Ii1M2IJ4mGZOERk2i7UTUam?usp=sharing

**साध्य उद्दिष्ट :** गणित व इंग्रजी या कठीण वाटणाऱ्या विषयाबद्दल मुलांच्यामध्ये आवड निर्माण करून आवश्यक संपादणूक पातळी गाठणे.

**कृती क्र. ४ आमचा बिनविजेचा दूरदर्शन :**

मुलांना मोबाईल इतकेच दूरदर्शनचे प्रचंड आकर्षण असते. या साधनावर दिसणारी प्रत्येक गोष्ट मुले खूप अवधानपूर्वक व एकाग्रतेने पाहतात हे लक्षात आल्यावर घरातील टाकाऊ पुठ्ठयापासून एक दूरदर्शन उपकरण बनवले. शिवरायांचा इतिहास आणखी रंजकतेने शिकवण्यासाठी प्रत्येक पाठावर आधारित चित्रमाला तयार करण्यात आली. सदर प्रिंट रोल विशिष्ट पद्धतीने या उपकरणात सरकवण्याची सोय केली. मुलानी खूप आवडीने ही चित्रमालिका पहिली. खूप प्रभावीपणे व आनंदपूर्ण वातावरणात मुलांनी आपल्या महाराष्ट्राचा प्रेरणादायी इतिहास समजून घेतला.




**सदर उपकरणाची समग्र शिक्षा महाराष्ट्र ने देखील दाखल घेतली होती.**

**व्हिडिओ लिंक :** https://youtu.be/1yT4d3ChYZk?si=AzLEDslnvIPA38QU

**साध्य उद्दिष्ट :** आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांची स्वयंप्रेरणा जागृत करून त्यास नवीन ज्ञानप्राप्तीसाठी आव्हान देणे.

**कृती क्र.५. 'शिकू आनंदे यु ट्यूब गुरूजी संगे'**

प्रज्ञाशोध परीक्षामधील काही महत्वाच्या घटकावर आधारित स्वनिर्मित Animated Video बनवण्यात आले. सदर अभ्यासमाला YouTube वर अपलोड करून सोबत त्याच्या Discription मध्ये प्रत्येक घटकावर आधारित ऑनलाईन टेस्ट ही देण्यात आली.

नमुना व्हिडिओ लिंक : विषय : बुद्धिमता घटक : रांगेतील स्थान

https://youtu.be/vfuC2Od02Ro

नमुना ऑनलाईनटेस्ट लिंक : https://forms.gle/nukSePnUR7yTkxnj9

**कृती क्र.६. सीडबॉल घेऊ हाती**

पर्यावरण जागृतीसाठी वृक्ष संवर्धनाचे प्रेम मुलांच्यामध्ये अनोख्या पद्धतीने निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला. **सकस माती, खते व बिया यांच्या मिश्रणातून सीडबॉल बनवण्याचे प्रशिक्षण मुलांना देण्यात आले. मुलांच्या सहभागातून अशा सीडबॉल ची निर्मिती करून मुलांच्या हस्ते याचे रोपण करण्यात आले.** यासोबत पालक व ग्रामस्थ यांनाही याबाबतची माहिती देऊन त्यांच्याकडूनही अशी अनोखी वृक्ष लागवड करण्यात आली. या उपक्रमाची विशेष दखल घेत आपापल्या परिसरामध्येही अशा अनोख्या पद्धतीने वृक्षारोपण केले.



- **साध्य उद्दिष्ट :** बाल्यअवस्थेत असताना मुलांना आरोग्य, **पर्यावरण जाणीव** व वाचन कौशल्य या मुलभूत गोष्टीचे महत्व समजावे यासाठी पूरक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

**कृती क्र.७. प्लास्टिकमुक्त रविवार, सुंदर करू आपला आवार**

रविवार या सुट्टीच्या दिवशी मुले आपल्या परिसरातील प्लास्टिकचा कचरा गोळा करतात. प्लास्टिक वस्तू न वापरण्याबाबत शपथ घेऊन गावामध्ये जागृती देखील करतात. प्लास्टिक कचरा व बॉटल पासून इको ब्रिक्स बनवण्याचे प्रशिक्षण देखील मुलांना देण्यात आले.

**साध्य उद्दिष्ट :** बाल्यअवस्थेत असताना मुलांना आरोग्य, **पर्यावरण जाणीव** व वाचन कौशल्य या मुलभूत गोष्टीचे महत्व समजावे यासाठी पूरक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

व्हिडिओ लिंक : https://youtu.be/ZSJwrr3giT4

**कृती क्र.८. आता बुके नाही बुक-नोटबुक घेऊ हाती :** मुलांना पुस्तक वाचनाची आवड वाढावी. वाचनासाठी शाळेतही पुरेसी ग्रंथसंपदा उपलब्ध व्हावी, यासाठी ही अभिनव प्रथा स्वकृतीतून सुरु केली. वाढदिवस किंवा आनंदाच्या क्षणी कोणीही पुष्प किंवा बुके देण्याऐवजी बुक किंवा नोटबुक देण्याचे व घेण्याचेही विद्यार्थी व पालकांनाही आवाहन करण्यात आले. या सत्रात मला राज्यशासनाचा क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला व या परंपरेची सुरवात मी स्वतः पासूनच केली. बुके ऐवजी केवळ विद्यार्थी उपयुक्त बुक (बालसाहित्य) स्वीकारण्याचे आवाहन केले. याला उदंड प्रतिसाद मिळाला मुलांना उपयुक्त व आवडतील अशी पुस्तके भेट स्वरुपात प्राप्त झाली. माझ्या मुलासोबत परिसरातील ग्रामीण भागात शिकणाऱ्या ७५० मुलांना मला ही वाचनीय पुस्तके व शैक्षणिक साधने प्रदान करता आली. या प्रेरणेतून,आदर्शांतून मुले देखील वाढदिवसाला पुस्तके भेट देऊ लागली, यातून शाळेतील बालग्रंथालय समृद्ध झाले शिवाय मुलांनाही वाचनाची गोडी वाढली.



बसुदेव धनगरवाडा : येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व ३० कुटुंबांना प्राप्त शालींचे वाटपप्रसंगी सचिन देसाई व ग्रामस्थ.

**बुके नकोत पाठ्यपुस्तके घेऊ हाती!**

राज्य पुरस्कार प्राप्त शिक्षक देसाई यांचा उपक्रम; ७५० विद्यार्थ्यांना लाभ

**मिणचे खुर्द : डी. वाय. देसाई**

मुख्यमंत्र्यांच्या हस्ते क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मान झालेले मिणचे खुर्द (ता. भुदरगड) येथील व विद्यामंदिर बशाचामोळा शाळेचे शिक्षक सचिन देसाई यांनी शुभेच्छा स्वीकारताना बुके नको बुक व नोटबुक घेऊ हाती हा उपक्रम राबविला आहे.

या पुरस्कार प्राप्तीनंतर बशाचामोळा शाळेसोबत तांबाळे, झित्रेवाडी, मठगाव, तिरवडे, नांदोली, मिणचे, बसुदेव धनगरवाडा, पाटगाव, माडेकरवाडी, एरंडपे, अनफ बुद्रुक, अंतुर्ली, मठगाव, कुडतरवाडी, वरपेवाडी, पाळेवाडी आदी तालुक्यातील १८ शाळांमधील जवळपास ७५० मुलांना या शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. यामध्ये मुलांना उपयुक्त असे बालसाहित्य, वह्या, पॅड, चित्रकला साहित्य आदी वाटप करण्यात आले. याशिवाय बसुदेव धनगरवाडा येथील ३० कुटुंबांना भेट स्वरूपात प्राप्त शालींचेही वाटप करण्यात आले. गतवर्षीदेखील देसाई यांनी बालकांचे वक्तृत्वविश्व ही स्वतः लिहलेल्या भाषण संग्रह पुस्तिकाच्या एक हजार प्रती राज्यातील मुलांना व शिक्षकांना मोफत वाटल्या होत्या.



( उपक्रमाची दैनिक पुढारीने घेतलेली दखल)

फोटो संग्रह ड्राईव्ह लिंक :

https://drive.google.com/drive/folders/1OsXyZKk80_shFBIZO23ovL48x9KVs2Hh?usp=sharing

**साध्य उद्दिष्ट :** बाल्यअवस्थेत असताना मुलांना आरोग्य, पर्यावरण जाणीव व **वाचन कौशल्य** या मुलभूत गोष्टीचे महत्व समजावे यासाठी पूरक कार्यक्रमांचे आयोजन करणे.

**कृती क्र.९. वर्ड चेन :** शब्दसंपत्ती वाढवण्यासाठी **'वर्ड चेन'** हा वर्गातील कागद कचरा वापर आधारित उपक्रम सुरु करण्यात आला. शाळेतील रिकाम्या भिंतीवर अंताक्षरी पद्धतीने इंग्रजी शब्दसाखळी तयार करण्याचे मुलांना आवाहन देण्यात आले. मुले वर्गात पडलेल्या कागद कचऱ्याचा वापर करून शब्दसाखळी वाढवू लागली. कोणताही शब्द केवळ एकदाच वापरण्याचे बंधन होते त्यामुळे मुलांनी चांगला शब्द संग्रह केला मुलांच्या शब्द संपत्तीत ५०० हून अधिक सोप्या शब्दांची वाढ झाली.



**कृती क्र.१०. कोण होणार प्रश्नवीर ? :** मुलांनी सामान्यज्ञान व प्रज्ञाशोध घटकांवर आधारित माहिती समजपूर्वक लक्षात ठेवावी यासाठी विशेष प्रश्नमंजुषा सप्ताह राबविण्यात आला. यावेळी दररोज पहिला तास मुलांची विभिन्न घटक आधारित प्रश्नमंजुषा घेतली जाई. प्रत्येक मुलाचे स्कोर कार्ड तयार करून ते रोज १२:00 वाजता पालक ग्रुपवर ऑनलाईन पब्लिश केले जाई. या शिवाय सर्वात अग्रेसर राहणाऱ्या मुलाचा फोटो शिक्षक रोज आपल्या स्मार्ट वॉच मध्ये डिस्प्ले करू लागले यातून मुलांच्यामध्ये अनोखी स्पर्धा व प्रेरणा निर्माण झाली. मुलांची या स्पर्धातून व इर्षेतून उत्कृष्ट तयारी झाली. कमी काळात मुलांनी खूप महत्वाची माहिती ज्ञात करून घेतली. **या तयारी व प्रेरणेतून मुलांची सामान्यज्ञानाची चांगली तयारी झाली यावर्षी मुलांनी प्रश्नमंजुषा स्पर्धेत तालुक्यात प्रथम क्रमांक मिळण्यात यशही मिळवले.**



**'SMART STUDENT IN SMART WATCH'** प्रश्नवीर ठरलेल्या बालकाचा फोटो वर्गशिक्षक आपल्या घड्याळामध्ये प्रदर्शित करून मुलांना प्रबलन दिले जायचे. मुले अशी संधी स्वतः प्राप्त करण्यासाठी तयारी करू लागली

**साध्य उद्दिष्ट :** प्राथमिक स्तरावरील प्रज्ञाशोध परीक्षेस सामोरे जाण्यासाठी निश्चित केलेल्या अभ्यासक्रम घटकांची तयारी सरलतेने होण्यास वातावरण निर्मिती करणे.

(गुगल ड्राईव्ह) लिंक :
https://drive.google.com/drive/folders/13csRV6sicpuZ18dnQ4AYjIIrOFns6_J0?usp=sharing

**कृती क्र.११. ओळख धान्यादी मालाची व सकस आहाराची :** मुलांना आपल्या आहारातील धान्यादी मालाची ओळख व्हावी यासाठी वर्गामध्ये धान्याचे वर्गीकरण करण्याची विशेष सुविधा करण्यात आली. मुलांनी स्वतः धान्य प्रकाराचे शाळेत वर्गीकरण केले. या शिवाय सारणीचा वैशिष्टपूर्ण वापर करून यात शब्द कार्ड्स चा वापर करून यावर आधारित काही खेळ देखील घेण्यात आले. यातून मुलांना धान्यादी मालाची परिपूर्ण माहिती व त्याचा आपणास होणारा फायदा देखील समजला.



**व्हिडिओ लिंक :** [https://youtu.be/LYKzjFXlea4?si=xRRxs8sVJ4XBuYkE](https://youtu.be/LYKzjFXlea4?si=xRRxs8sVJ4XBuYkE)

**साध्य उद्दिष्ट :** <u>बाल्यअवस्थेत असताना मुलांना आरोग्य, **पर्यावरण जाणीव** व वाचन कौशल्य या मुलभूत गोष्टीचे महत्व समजावे यासाठी पूरक कार्यक्रमांचे आयोजन करणे.</u>

**कृती क्र.१२. आमचा रानभाज्या महोत्सव :** ग्रामीण भागातील मुलांच्यासाठी रानभाज्या म्हणजे खऱ्या अर्थाने एक नैसर्गिक देणगीच आहे. याचे महत्व मुलांना समजावे, यासाठी पावसाळ्यात मुलांच्या सहभागाने शाळेत रानभाज्या महोत्सव साजरा करण्यात आला. यावेळी मुलांनी पालकांच्या मदतीने रानातील रानभाज्या गोळ्या करून शाळेत आणल्या व त्याची माहिती सांगितली. याशिवाय उपलब्ध झालेल्या व न झालेल्या रानभाज्यांचीही माहिती देखील QR कोड सहित वर्गात लावण्यात आली.



**व्हिडिओ लिंक :** [https://youtu.be/LYKzjFXlea4?si=x9nypqvIGseMNKHk](https://youtu.be/LYKzjFXlea4?si=x9nypqvIGseMNKHk)

**कृती क्र.१३. स्वतः संगे बोलू काही :** या उपक्रम अंतर्गत मुलांना शेवटच्या सत्रात एकांतात रोज स्वतःशी आरश्यासमोर बोलण्याची सवय लावण्यात आली. यावेळी मुलांनी स्वतः शी मुक्त संवाद साधावा असे आवाहन करण्यात आले. दिवसभरात आपल्या कडून घडलेल्या चांगल्या किवा वाईट कृती मान्य करण्याची सूचना देण्यात आली. यातून मुलांना स्वकृतीचे आत्मचिंतन करण्याची सवय लागते. वागण्यात सकारात्मक बदल होत जातो. खोटे बोलण्याची सवय देखील हळू हळू कमी होत जाते. बोलण्यातील आत्मविश्वास देखील वाढीस लागतो. अशा प्रकारे स्वतःशी संवाद साधण्याची अनोखी संधी मुलांना उपलब्ध वेळी देण्यात आली



- **साध्य उद्दिष्ट :** <u>२१ व्या शतकातील कौशल्ये (6C) मुलांच्यामध्ये रुजवण्यासाठी प्रयत्न करणे.</u>

**कृती क्र.१४. 'रिडिंग रेस' :** मराठी व इंग्रजी वाचन वेग सुधारणारा **'रिडिंग रेस'** स्पर्धा आयोजित करण्यात आली. Stop Watch च्या मदतीने मुलांचा वाचन वेग मोजण्यात येई. वाचताना चुकीचा शब्द उच्चार झाल्यास त्याचा विचार करून त्यास गुणदान कमी केले जाई. विद्यार्थी स्कोर कार्ड बनवून यशस्वी मुलांचे अभिनंदन केले जाई. ज्यांचा वाचन वेग कमी आहे त्यांना अधिक वाचनाची संधी दिली जाई. अशा प्रकारे गती व अचूक वाचनासाठी ही कृती लाभदायक ठरली.

**कृती क्र.१५. 'जाऊ बाहुल्यांच्या जगात' :** मुलांना बाहुल्या विषयी प्रचंड आकर्षण असते यासाठी मराठी व इंग्रजी पाठ्यक्रमातील नाट्यमय घटकातील पात्रावर आधारित बाहुल्या बनवण्यात आल्या. काही बाहुल्या विकत घेतल्या. मुलांच्या सहभागाने असे पाठ रंजकतेने सादर करण्यात आले. यात क्रोमा इफ्फेक्ट चा वापर करत सदर सादरीकरणाचे रेकॉर्डिंग करून इ-साहित्य बनवण्यात आले त्यामुळे आमच्या व इतर शाळेतील मुलांना पुन्हा पाहता येणे शक्य झाले.




**व्हिडिओ लिंक :** https://youtu.be/WsnVUGzGvHA?si=E5fdz4nNeUQYqYOV

# इतर काही महत्त्वाच्या कृती उपक्रमाचे फोटो




रोबोटिक साहित्य जोडणी बाबत प्राथमिक माहिती घेताना विद्यार्थी





प्रज्ञाशोध सराव प्रश्न तपसणी तात्काळ करणाऱ्या PLICKERS ऑनलाईन प्रणालीचा वर्गात वापर




रंजकतेने गणित अध्ययन

प्रेरणा वाचनाची

https://youtu.be/TTFMNBMDA78?si=UH1SW9IAEt5Gv1W0

प्रज्ञाशोध परीक्षा करिता निश्चित केलेल्या अभ्यासक्रम घटक आधारित,

## नवोपक्रम अंतर्गत वापरलेल्या इतर काही नावीन्यपूर्ण अध्ययन पद्धती

| .क्र | घटक | विद्यार्थ्यांना दिलेला नाविन्यपूर्ण अध्ययन अनुभव |
|---|---|---|
| १. | **समानार्थी, विरुद्धार्थी शब्द** | मुलांचे दोन गट तयार करणे. एका गटाला समानार्थी मधील प्रश्न शब्दांचा चिठ्या स्वरुपात संग्रह देणे व दुसऱ्या गटाला त्याचा उत्तर स्वरुपात असणाऱ्या चिठ्यांचा संग्रह दिला जाईल. पहिला गट प्रथम कोणताही शब्द दाखवेल त्याचे उत्तर दुसरा गट चिठ्ठी दाखवूनदेईल. अशाच प्रकारे विरुद्धअर्थी सराव घेता येईल. |
| २. | **लिंग** | तो, ती, व ते अशी शब्द कार्ड बनवून ती चित्रासमवेत जोडी लावून वाचन करण्यास सांगणे. काही प्रसंगी प्रत्यक्ष वस्तूंचा वापर करता येईल. जसे. तो डस्टर, ती खुर्ची, ते पुस्तक. |
| ३. | **वचन** | यासाठी काही वस्तूंचा वापर केला जाईल. दोन दोन प्रमाणे मुलांच्या जोड्या केल्या जातील. जोडीतील पहिल्या मुलाकडे जी वस्तू एकच  असेल तीच वस्तू जोडीदाराकडे अनेक स्वरुपात असेल. जसे मुलगा एक पुस्तक दाखवून सांगताच जोडीदार अनेक पुस्तके असे वस्तू दाखवून सांगेल. वस्तू उपलब्ध नसतील तर चित्रे देखील आपण वापरू शकतो. |
| ४. | **कालमापन** | घड्याळमधील काट्यांची रचना समजण्यासाठी फळ्यावर घड्याळाची आकृती रेखाटून काटे ऐवजी हाताचा वापर करणे. |
| ५. | **परिमिती** | दोऱ्याचा वापर करून विविध आकाराभोवती गुंडाळून नंतर त्याची लांबी मोजण्यास सांगणे. |
| ६. | **परिमाणे** | किराणा दुकान, कापड दुकान व दुध संस्था या ठिकाणी प्रत्यक्ष भेट देऊन प्रात्यक्षिक रुपात परिमाण समजावून देणे. |
| ७. | **क्षेत्रफळ** | एका मोठ्या पेपरवर विशिष्ठ लांबी व रुंदीचा आयत किंवा चौरस रेखाटून त्याच्या आतील भागात प्रत्येक इंचच्या खुणावर आडव्या व उभ्या रेषा मारून आतील भागात १ इंच  लांबी व रुंदीचे चौरस तयार करणे. असे किती चौरस तयार होतात हे मोजण्यास सांगणे. काही कृती फरशी व मैदानावर देखील घेता येतील. |
| ८. | **आरश्यातील प्रतिमा** | प्रत्यक्ष आरसा वापरून आकृतीची प्रतिमा कशी पडते ? याचा अनुभव मुलांना देणे. यावरून उदा. कशी सोडवावी याबाबत मार्गदर्शन |
| ९. | **रांगेतल स्थान** | मुलांची प्रत्यक्ष रांग बनवून त्यांना आव्हानात्मक प्रश्न विचारून घटक समजावून देणे.त्यांना विविध आव्हाने देणे. |

- **उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्याच्या नोंदी :-**

उपक्रमाच्या अंती निरीक्षण केले असता उपक्रमातील विविध कृती कार्यक्रमांच्यामुळे मुलांच्यात खालील सकारात्मक बदल घडून आल्याचे लक्षात आले.

- मुलांना इंग्रजी वाचनाची गोडी वाढली सर्व विद्यार्थी इंग्रजी शब्द वाचन करू लागले काही विद्यार्थी इंग्रजी उतारा वाचन देखील करू लागली.
- मराठी कार्यात्मक व्याकरण, शब्दसंपत्ती व सामान्यज्ञान यावर मुलांचे प्रभुत्व निर्माण झाले. यातील अधिक माहिती जाणून घेण्यासाठी मुले जिज्ञासू बनली.
- गणित विषयाची भीती कमी होऊन गणित हा सर्वात आवडता विषय बनला. काठीण्यपातळी अधिक असणारी शिवाय शब्दिक उदाहरणे समाजपूर्वक सोडवू लागली.
- बुद्धिमता मधील कुटप्रश्न व आव्हानात्मक प्रश्न सोडवण्यासाठी मुले उत्सुक बनली.
- मुलांची मराठी व विशेष करून इंग्रजी शब्दसंपत्ती वाढली.
- मुले मोबाईल चा वापर अधिकतर केवळ अभ्यासासाठी करू लागली.
- मुलांना परिसरातील पिकांची, धान्यादी मालाची, व सकस आहाराची चांगली जाणीव झाली.
- मुलांना रानभाज्यांचे देखील आहारातील महत्व समजले. आपल्या आहारात ती रानभाज्या असण्याबाबत घरी हट्ट करू लागली.
- रोबोटिक उपकरणे कशी असतात ? कशी जोडली जातात ? कशी काम करतात ? याची ऑनलाईन माहिती शोधू लागली. त्यातून मिळालेली माहिती नोंद करू लागली आपल्या सहकार्यांना सांगू लागली.
- उपक्रमातून निर्माण झालेल्या वाचनालयातील पुस्तके आवडीने वाचू लागली. रिकाम्या वेळी किंवा सुट्टीच्या दिवशी वाचनासाठी पुस्तकांची मागणी करू लागली.
- प्रेरणादायी स्टीकर्स मुळे मुलांच्या वर्तनात बराच बदल झाला. मुलांच्या वागण्यात, बोलण्यात सकारात्मकता आली. स्वतःबद्दल आत्मविश्वास व आदरभाव निर्माण झाला.
- खोटे बोलणे, चोरी करणे, उद्धटपणे बोलणे अगर दुसऱ्याशी असहकाराने वागणे या अपप्रवृत्तीला देखील आळा बसला.
- मुले प्रश्न सोडवण्याबरोबर स्वतः योग्य प्रश्ननिर्मिती करू लागली.
- मुलांना Good Touch & Bad Touch याबाबत समज आली.
- मुलांना पर्यावरण बाबत आवश्यक जाणीव निर्माण झाली. वृक्षरोपण सोबत वृक्षांची काळजी घेण्याची देखील मुलांना सवय लागली.
- मुलांना शिवकालीन इतिहास सहजपणे ज्ञात झाला. मुले शिवरायांच्या जीवनाविषयी अधिक माहिती शोधू लागली.
- २१ व्या शतकातील अपेक्षित कौशल्ये (6C) मुलांच्यात निर्माण झाल्याचे निरीक्षणातून लक्षात येऊ लागले.

उपक्रम पूर्ण झाल्यानंतर दिसून आलेल्या नोंदी सकारत्मक अशा होत्या. निश्चित केलेली उद्दिष्टे सफल झाल्याचे जणू द्योतक असल्याचे समाधान प्राप्त झाले. या वयोगटातील मुलांच्यात खऱ्या अर्थाने आवश्यक असणाऱ्या क्षमता, कौशल्ये व मुल्यांची पायाभरणी झाली.

## ▪ कार्यवाहीत आलेल्या अडचणी व त्यावरील उपाययोजना :

नवोपक्रम राबवत असताना फार मोठ्या समस्या आल्या नाहीत पण ज्या काही समस्या, अडचणी आल्या पण त्यांचा सारासार विचार करुन प्रसंगी अनुभवी शिक्षकमित्र, तज्ञांचे तसेच वरिष्ठांचे मार्गदर्शन घेवून समस्या सोडवण्यात आल्या. योग्य पर्यायांचा विचार करण्यात आला. यातून नवोपक्रम यशस्वी करण्याचे स्वप्न साकार झाले.

**1 ) नवोपक्रम अंतर्गत मुलांच्याकडून सीडबॉल निर्मिती प्रकल्प करून घ्यायचे ठरवले, पण याबाबत थोडेच ज्ञान होते. परिपूर्ण माहिती असणे प्रकल्प यशस्वी करणेस आवश्यक होते.**

➢ सदर उपक्रम बाबत पर्यावरणस्नेही श्री. सुधीर गुरव सर यांच्याशी चर्चा केली असता त्यांनी याबाबत सखोल असे मार्गदर्शन केले. माती कोणती वापरायची ? खताचे प्रमाण कसे असावे ? बिया कोणत्या वापरायच्या. बॉलला सुबक आकार कसा द्यायचा ? याबाबत देखील मार्गदर्शन केले. याशिवाय यासाठी लागणाऱ्या बिया पुरवण्याचे काम देखील तालुक्याचे कृषी अधिकारी मा.भोकरे साहेब यांनी केले. मला स्वतःला याबाबत आवश्यक माहिती झालेवर मी मुलांना देऊ शकलो.

**2 ) बोलक्या बाहुल्यांचा प्रभावीपणे वापर करायचा होता, हा प्रयोग प्रथमच करत असल्याने याची निर्मिती व वापर याबाबत अल्पज्ञान होते.**

➢ मुलांना सर्वात आकर्षण वाटणाऱ्या बोलक्या बाहुल्या यावर आधारित काही कार्यक्रम ठरवले होते. पण या बाहुल्या बनवणे त्याचा वापर करण्याचे कौशल्य याबाबत अनुभव कमी होता. यासाठी बोलक्या बाहुल्याचे सुंदर खेळ करून दाखवणारे कला शिक्षक श्री. तुकाराम पाटील सर यांची मोलाची मदत झाली. त्यांनी बोलक्या बाहुल्या कशा बनवायच्या ? कशा वापरायच्या याचे प्रत्यक्ष शाळेत येऊन मार्गदर्शन केले. याचा प्रभावी वापर शक्य झाला.

**3 ) रोबोटिक्स बाबत माहिती देण्यासाठी काही साहित्य घेणे आवश्यक होते. असे साहित्य बाजारात महागडे होते.**

➢ माझ्या 'फौंडेशनल कोर्सेस फॉर लिटल मास्टर्स' या उपक्रमाची विशेष दखल घेऊन मला यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई यांच्यातर्फे दिल्या जाणाऱ्या शरद पवार इन्स्पायर फेलोशिप इन एजुकेशन २०२३ साठी निवड झाली. या फेलोशिपच्या मदतीतून मला बरेच साहित्य सहजपणे विकत घेता आले. मुलांना रोबोटिकची ओळख करून देता येणे शक्य झाले.

**४ ) 'Good Touch & Bad Touch' हा संवेदनशील विषय प्रथमतः मुलांना कसा समजवून सांगावा ? हे माझ्यासमोर आव्हान होते.**

➢ या विषयावर गगनबावडा तालुक्यातील विषय शिक्षक श्री.सतीश कुंभार यांनी आपल्या शाळेत खूप प्रयोग केले होते अनेक मॉडेल देखील बनवले होते. त्याबाबत मी यापूर्वी ऐकले होते. त्यांच्या आदर्श व मार्गदर्शनातून हा गंभीर विषय देखील किती सहजपणे समजावून सांगता येतो हे लक्षात आले. हा विषय मुलींना नीट समजावून सांगण्यासाठी माता पालकांची देखील मोलाची मदत झाली.

प्रत्येक समस्या प्रसंगी योग्य मार्गदर्शन व सहकार्य मिळाल्यामुळे उपाययोजना करणे सहजशक्य झाले.

## ❑ ६. उपक्रमाची फलनिष्पत्ती / यशस्विता (उदिष्टानुसार)

८ ते १० वयोगटातील मुलांच्या समोरील आव्हाने, समस्या व गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या प्रज्ञा विकासाबरोबर 21 व्या शतकातील कौशल्ये प्राप्तीसाठी राबवलेला हा कृती कार्यक्रम सर्वांचे साठी दीर्घकालीन दिशादर्शक असा आहे. या प्रेरणादायी प्रवासाचा अनुभव आनंददायी तर होताच पण यापेक्षाही खरा आनंद वाटतो की, आम्ही निश्चित केलेली उद्दिष्टे साध्य करण्यात अपेक्षेप्रमाणे यशस्वी झालो !

**१. आनंददायी वातावरणात विद्यार्थ्यांची स्वयंप्रेरणा जागृत करून त्यास नवीन ज्ञानप्राप्तीसाठी आव्हाने देणे**

'प्रेरणा' हा या नवोपक्रमाचा आत्मा होता. मुलांना केवळ शिकण्याची नाही तर इतर महत्त्वाच्या प्रेरणा देखील मिळाल्या. प्रश्नमंजुषा, कोण होणार प्रश्नवीर, क्वशन बँक, बिनविजेचा दूरदर्शन, विविध प्रबलनात्मक कार्यक्रम यामधून मुलांची जिज्ञासा व चिकित्सकवृत्ती अधिक जागृत झाली. त्यांना नवीन गोष्टी शिकण्याची, अभ्यासाची प्रेरणा मिळाली. प्रेरणादायी स्टीकर्स मधून चांगल्या वर्तन बदलाची प्रेरणा मिळाली. App वापर, रोबोटिक्स साधने मधून आधुनिक तंत्रज्ञान शिकण्याची प्रेरणा मिळाली, बोलक्या बाहुल्यांच्या विश्वात रमताना कलेची प्रेरणा मिळाली. मिनी बँक संकल्पनेतून मुलांना बचत करण्याची अनोखी प्रेरणा प्रथमच मिळाली. अशाप्रकारे प्रत्येक कृतीतून कोणती ना कोणती प्रेरणा मिळाली, ज्यातून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साध्य करणे शक्य झाले.

- **२. प्राथमिक स्तरावरील प्रज्ञाशोध परीक्षेस सामोरे जाण्यासाठी निश्चित केलेल्या अभ्यासक्रम घटकाची तयारी सरलतेने होण्यास वातावरण निर्मिती करणे.**

मराठी, इंग्रजी, बुद्धिमत्ता, गणित यासह परिसर अभ्यास या विषयांतर्गत ज्ञानवृद्धी होईल, नवीन ज्ञान मिळण्याची प्रेरणा जागृत होईल अशा विविध कृती कार्यक्रमांचा यात विचारपूर्वक सामावेश केल्यामुळे मुलांचा योग्य प्रकारे बौद्धीक विकास झाला. मुलांना ह्यातील घटक शिकवताना मनोरंजक वाटेल याचा विचार करण्यात आला होता. घरदर्शक, पिल्लूदर्शक शब्द खेळातून शिकवणे बकेट शो सारख्या कृती मुलांना आनंदाने शिक्षण देणाऱ्या होत्या. पायाभूत तयारी चांगली झाली, विविध प्रश्न प्रकारांचा सराव झाल्यामुळे मुलांची परीक्षा तयारी अतिशय उत्कृष्ट झाली. उत्तर चाचणी पर्यंत मुलांच्या गुणांचा आलेख चढत्या क्रमाने झाल्याचे स्पष्टपणे दिसून आले.

- **३. गणित व इंग्रजी या कठीण वाटणाऱ्या विषयाबद्दल मुलांच्यामध्ये आवड निर्माण करून उच्चतम संपादणूक पातळी गाठणे.**


मुलांच्या मनात गणित विषयाबद्दल अनामिक भीती वाटत होती. त्याऐवजी मुले आता कोणत्याही प्रकारची गणिते अगदी सहजपणे सोडू लागली आहेत. इतकेच काय स्वतः गणितीय उदाहरणे देखील तयार करू लागले आहेत. गणित पाठ्यक्रमातील अध्ययन निष्पत्ती सोबत प्रज्ञाशोध परीक्षेसाठी निश्चित केलेल्या गणित घटकाची तयारी देखील चांगली झाली. इंग्रजी वाचन करण्यात मुलांना पूर्वी अडथळा येत होता पण आता मुले सहजपणे इंग्रजी वाचन करतात. मुलांची मराठी सोबत इंग्रजी शब्दसंपत्ती देखील वाढली आहे . 500 हून आधी इंग्रजी शब्दांचे मुलांना आता अर्थ ज्ञात आहेत. इंग्रजी संभाषण मध्येही मुले आवडीने भाग घेऊ लागलीत.

**४. २१ व्या शतकातील कौशल्ये (6C) मुलांच्यामध्ये रुजवण्यासाठी विशेष प्रयत्न करणे.**

21 व्या शतकातील कौशल्य निर्मिती हे सर्वात मोठे आव्हान होते. पझल गेम सारख्या कृतीतून चिकित्सक विचार, रोबोटिक मधून सर्जनशील विचार, सिडबॉल निर्मिती प्रकल्प मधून सहयोग, जाऊ बोलक्या बाहुल्यांच्या जगात संवाद कौशल्य, याशिवाय प्रश्नमंजुषा स्पर्धा मधून आत्मविश्वास, प्रेरणादायी स्टिकर्स मधून करुणा अशा प्रकारे ही सर्व (6C) कौशल्ये सर्व मुलांच्या मध्ये रुजवण्यात हा नवोपक्रम अंतर्गत विविध कृती अतिशय लाभदायक ठरल्या आहेत.

**५. बाल्यअवस्थेत असताना मुलांना वाचन, आरोग्य, शारीरिक शोषण, बचत व पर्यावरण जाणीव या मुलभूत गोष्टीचे महत्व समजावे यासाठी पूरक कार्यक्रमांचे आयोजन करणे.**

'बुके नकोत आता बुक घेऊ हाती' या उपक्रमातून माझ्या शाळेसह इतर ७५० शाळेतील मुलांना पुस्तके भेट देऊन वाचण्याची अनोखी प्रेरणा देण्यात सफल झालो. शाळेचे बालग्रंथालय अधिक समृद्ध झाले. मुलांना आहाराविषयी व स्वच्छतेविषयी चांगल्या सवयी लागल्या. रानभाज्या, जैविक खते याबाबत अधिक जागरूक झालीत. शारीरिक शोषण बाबत मुले सजग झालीत, चांगला वाईट स्पर्श या बाबत आवश्यक ती माहिती मुलांना ज्ञात झाली होती. मुलांना अर्थनियोजन करण्याची चांगली सवय योग्य वयात लागली. पर्यावरण विषयक जाणीव देखील मुलांच्या मनामध्ये निर्माण झाली. प्राणी व झाडे यांच्याबाबत मुलांचा दृष्टीकोन सकारात्मक झाला.




उपक्रमाची फलनिष्पत्ती / यशस्विता पुरावे ड्राईव्ह लिंक :

https://drive.google.com/drive/folders/1mnEr9AL2PYckWf32feFzwAglr6bsk9Ny?usp=sharing


## ■ माहितीचे विश्लेषण व आलेख तक्ते :-

या नवोपक्रमात शिक्षक, विद्यार्थी व पालक यांची आंतरक्रिया योग्य प्रकारे साधली गेली. मुक्त, आनंदपूर्ण व सुरक्षित वातावरणात मुलांनी शिक्षणाची अनुभूती घेतली यातून आपेक्षित उद्दिष्ट साध्य झाले. आवश्यक गुणात्मक पातळीत वाढ झाली. बालकाचा सर्वांगीण विकास साध्य करण्यात यश प्राप्त झाले. नवोपक्रम च्या सुरवातीच्या काळात पूर्व चाचणी घेतली होती. यात विद्यार्थी क्षमता, कौशल्य आणि वर्तन यांचे निरीक्षण करून योग्य प्रकारे नोंदी ठेवण्यात आल्या. नवोपक्रमअंती अशीच समांतर निरीक्षणात्मक उत्तर चाचणीही घेतली. या सर्वातून मुलांच्यातील समाधानकारक बदल, प्रगती व त्याचा आलेख दृष्टीक्षेपात आला.

**विद्यार्थ्यांच्यामध्ये उपक्रम पूर्वस्थिती व उपक्रमोत्तर स्थिती मध्ये झालेली गुणात्मक वाढ**

एकूण पटसंख्या १८ निरीक्षण केलेली विद्यार्थी संख्या १८

| अ. क्र | निरीक्षण केलेली क्षमता, कौशल्य / अध्ययन निष्पती | पूर्वचाचणी वेळी प्रभुत्व संपादित विद्यार्थी संख्या (१८ पैकी ) | उत्तर चाचणी वेळी प्रभुत्व संपादित विद्यार्थी संख्या (१८ पैकी ) | शेकडा वाढ |
|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी शब्द व सोपी वाक्य वाचन करणारे | ७ | १७ | ५५.५५% |
| २ | समानार्थी, विरुद्धार्थी, म्हणी, वाक्यप्रचार,अलंकारिक शब्द, जोडशब्द आदी शब्दसंपत्तीवर प्रभुत्व असणारे | ९ | १८ | ५०.००% |
| ३ | कार्यात्मक व्याकरण आधारित अचूक उदा. सोडवणारे | ७ | १८ | ६१.११ % |
| ४ | बुद्धिमतामधील कुटप्रश्न व प्रतीमावरील प्रश्न सोडवता येणारे | ६ | १७ | ६१.११% |
| ५ | गणित मधील शाब्दिक उदाहरणे समजपूर्वक सोडवणारे | १० | १८ | ४४.४४ % |
| ६ | लेखनात विरामचिन्हे योग्य प्रकारे वापरणारी | ९ | १७ | ४४.४४ % |
| ७ | Good Touch & Bad Touch याबाबत माहिती असणारी | १ | १८ | ९४.४४% |
| ८ | दिलेल्या घटकावर स्वतः प्रश्न तयार करणारी | २ | १८ | ८८.८८ % |
| ९ | स्वतः ची चूक मान्य करणारी | ८ | १८ | ५५.५५ % |
| १० | मोबाईलचा वापर केवळ अभ्यासासाठी करणारी | ४ | १७ | ७२.२२ % |
| ११ | स्वतः हून झाडे लावून काळजी घेणारी | २ | १८ | ८८.८८ % |
| १२ | शालेय वाचनालयातील पुतके वाचण्यास घेणारी | ४ | १८ | ७७.७७ % |
| १३ | धान्यादी मालाची ओळख असलेली | ५ | १८ | ७२.२२% |
| १४ | रानभाज्यांची माहिती असणारी व आहारात खाणारी | ३ | १८ | ८३.३३% |
| १५ | शिवरायांच्या जीवनाबद्दल आपल्या शब्दात माहिती सांगणारी | २ | १८ | ८८.८८% |




**<u>मुल्यामापनासाठी वापरलेली तंत्रे</u>**

- निरीक्षण
- प्रात्यक्षिके
- प्रयोग
- मुलाखत / तोंडी परीक्षा

**<u>मुल्यामापनासाठी वापरलेली साधने</u>**

- प्रश्नावली (लेखी चाचणी)
- रुब्रिक
- पडताळा सूची
- पदनिश्चयन श्रेणी

**पूर्व चाचणी व उत्तर चाचणी पुरावे-**
https://drive.google.com/drive/folders/1hmKcfOQvZWBoXCNrPdwxYSndvYc-ZQEN?usp=sharing

# नवोपक्रम अंतिम स्थिती (श्रेणी निहाय )

( ९१ ते १००= **अ+** ८१ ते ९० = **अ** ७१ ते ८० = **ब+** ६१ ते ७० = **ब** )

| अ. क्र. | विद्यार्थी नाव | भाषा क्षेत्र | गणित व बुद्धिमता क्षेत्र | कौशल्य (6C) प्राप्ती | अपेक्षित मुल्ये व वर्तनबदल | पर्यावरण जागरुकता जाणीव | एकूण गुण | श्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | निर्धारित गुण | २० | २० | २० | २० | २० | १०० | |
| १ | पाटील साईराज सुनिल | १९ | १९ | १९ | २० | २० | ९७ | अ+ |
| २ | पाटील कीर्ती पांडुरंग | १९ | १८ | १८ | २० | २० | ९५ | अ+ |
| ३ | पोवार श्रेयश अनिल | २० | १९ | १९ | १९ | २० | ९७ | अ+ |
| ४ | वांजोळे विराज विजय | १६ | १७ | १७ | १६ | १८ | ८४ | अ |
| ५ | पोवार प्राजक्ता जनार्दन | २० | १९ | १९ | २० | २० | ९८ | अ+ |
| ६ | पोवार आयुष प्रकाश | १७ | १८ | १७ | १७ | १९ | ८८ | अ |
| ७ | संकपाळ धनराज दीपक | १९ | १८ | १७ | १८ | १९ | ९० | अ |
| ८ | संकपाळ शुभम बबन | १५ | १६ | १७ | १६ | १८ | ८२ | अ |
| ९ | गुरव ईश्वरी तानाजी | १९ | १७ | १७ | २० | २० | ९३ | अ+ |
| १० | पाटील शिवम विश्वजीत | १८ | १७ | १९ | १८ | १८ | ९० | अ |
| ११ | भुतल भक्ती हरिश्चंद्र | १८ | १८ | १७ | १९ | १९ | ९१ | अ+ |
| १२ | वांजोळे अथर्व दीपक | १६ | १६ | १७ | १८ | १८ | ८५ | अ |
| १३ | आसावरी संतोष पाटील | २० | १९ | १९ | २० | २० | ९८ | अ+ |
| १४ | अनुज अरविंद पाटील | २० | २० | २० | २० | १९ | ९९ | अ+ |
| १५ | हर्षवर्धन संजय गुरव | १७ | १७ | १९ | १९ | १९ | ९१ | अ+ |
| १६ | श्रेया गणपती देसाई | १७ | १७ | १६ | १९ | १९ | ८८ | अ |
| १७ | आदित्य आनंदराव देसाई | १५ | १५ | १७ | १९ | १९ | ८५ | अ |
| १८ | उर्वी विकास येरम | १२ | १३ | १२ | १७ | १८ | ७२ | ब+ |

**मुल्यांकन मानके, पूर्वस्थिती व अंतिम स्थिती विस्तृत पुरावे ड्राईव्ह लिंक :**

https://drive.google.com/drive/folders/1LbunjeQQhEfCFD-cwiRETLpaTyCToXEI?usp=sharing

# नवोपक्रम अंतर्गत साध्य विद्यार्थी विकास क्षेत्रे





**Mindmap**

Areas Of Inclusive Student Development Under Innovation


# नवोपक्रमबाबत निवडक प्रतिक्रिया व अभिप्राय ....

MOB: 9767332509




🌷🌷🌷🌷🌷🌷🌷 सर,
*तुमच्या कामाला चॅलेंज नाही.तुमचे नवनवीन अतिशय प्रभावी आहे उपयुक्त उपक्रम केवळ परिसरातील शिक्षकांनाच नाही तर राज्यातील असंख्य शिक्षक आणि शिक्षणप्रेमी नागरीकांना नक्कीच आवडतात.हीच आपल्या कार्याची पावती आणि प्रमाणपत्र आहे.आपले विविध उपक्रम आणि आपण राबवलेल्या विविध नवनीन कल्पना विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी उपयुक्त ठरतात....आपली राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी निवड झाली याचा मला सार्थ अभिमान आहे.अशीच आपली उत्तरोत्तर प्रगती होत राहो,असेच नवनवीन शैक्षणिक प्रयोग,उपक्रम आपल्या हातून राबोत हीच ईश्वर चरणी प्रार्थना....राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा.*🌷🌷🌷🌷🌷🌷🌷
🌷🌷🌷🌷🌷🌷🌷

9:47 am




आधुनिक सारथी* या राज्यस्तरीय मासिकामध्ये डिसेंबर, 2023 च्या आवृत्तीत 'बालवयात विद्यार्थ्यांप्रति असणारे बचतीचे महत्व' या विषयवार आदरणीय सचिन देसाई सरांनी लिहलेला लेख वाचला.

**अतिशय सुंदर व उद्बोधक शब्दांकन**
खूपच छान, आवडला आहे .

सचिन सर आपले मनापासून पुन्हा पुन्हा अभिनंदन .
🌺🌺🌷🌷🌷🌸🌸
धन्यवाद 🙏🙏

5:40 am

🙏😊 5:43 am

MOB: 8551057503
ग.शि.अ.पं.स.राधानगरी





खूप चांगला लेख.
हा बचतीचा संस्कार मुलांवर लहान वयातच होणं आवश्यक आहे . या निमित्ताने मला माझ्या हायस्कूल जीवनातला प्रसंग आठवतोय . ८वी ते १०वी मी कळे विद्यामंदिर , कळे या माध्यमिक विद्यालयात शिकलो . खूप मोठं आणि जूनं हायस्कूल . तिथे अनंतराव मिठारी नावाचे गावातीलच एक शिक्षक होते . ते हायस्कूलमध्ये मुलांसाठी संचयिका चालवायचे. मुलांना खाऊ साठी घरच्यांनी दिलेले पैसे मुले संचयिकेत गुंतवायची . संचयिकेचे एक छोटं पासबुक होत , त्यावर मिठारी सर जमेची entry करून द्यायचे . जाता येता कुठेही मुले त्यांना पन्नास पैसे, पंचवीस पैशापासून २ , ५ रुपयापर्यंत बचतीसाठी द्यायचे.सर तिथेच छोट्या पासबुकावर लिहून द्यायचे . अशा प्रकारे जमा झालेल्या पैशातून मुले वही, पेन ., कंपास , पुस्तके यासारख्या वस्तु गरजेला खरेदी करायची . कांही बऱ्यापैकी घरची परिस्थिती असलेली मुले या बचतीतून शाळेच्या सहलीला जायची . शाळा मोठी असलेने सहलीच्या किमान दोन तीन गाडया ( एसटी ) जायच्या .





**भेट मिळालेल्या शाली ३० कुटुंबांना व पुस्तके १८ गावातील ७५० मुलांना भेट देणारा , स्वत: लिहिलेल्या पुस्तकांच्या १००० प्रती शिक्षक/ विद्यार्थी यांना मोफत वाटणारा अवलिया शिक्षक-सचिन देसाई**
**(सचिन देसाई यांनी बशाचामोळा शाळेत राबवलेला "माझी शाळा माझी परसबाग" उपक्रमाचे सादरीकरण राजभवन येथे मा.राज्यपाल महोदय, मा.मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री महोदय यांच्या समोर होऊन हा उपक्रम महाराष्ट्र सरकारने स्वीकारला आहे.)**
**[ भरमसाठ पगार असताना, मिळेल ते फुकटचे जमा करणारे लोक समाजात असताना सचिनसारख्या वेड्या माणसाची मूठ मात्र समाजासाठी सैल आहे.]**

MOB: 8007059084



**क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित शिक्षक सचिन देसाईचे समाजभान**
---🙏🙏🙏🙏---
**सन २०२२-२३ चा राज्य आदर्श पुरस्कारप्राप्त शिक्षक सचिन देसाई यांनी पुरस्कार मिळाल्याबद्दल सत्कार प्रसंगी मिळालेल्या शालींचे वाटप वसुदेव धनगरवाडा येथील ३० कुटुंबातील लोकांना करून राज्यात आगळं वेगळं उदाहरण प्रस्तावित केले. पुरस्कार वा कार्यक्रमात मिळालेल्या शालींची कपाटेंच्या कपाटे भरून ठेवणारे लोक समाजात दिसत असताना सचिनने मात्र जगावेगळे दिशादर्शक उदाहरण दाखवून दिले आहे.**
**राज्य पुरस्कार मिळाला म्हणून सत्कार समारंभ ठेवला असता 'बुके नकोत, बुक ( पाठ्यपुस्तके )द्या' असं सांगितलं गेलं. समारभांत सचिनवर अमाप प्रेम करणाऱ्या लोकांनी भरभरून पुस्तके भेट होती. ही सर्व पुस्तके १८ शाळांतील ७५० मुलांना भेट दिली.**
**सचिन देसाई यांनी स्वत: लिहिलेल्या "बालकांचे वक्तृत्वविश्व" या भाषण संग्रहाच्या १,००० प्रती राज्यातील शिक्षक व मुलांना मोफत वाटल्या आहेत.**



**अमाप प्रेम करणाऱ्या लोकांनी भरभरून पुस्तके भेट होती. ही सर्व पुस्तके १८ शाळांतील ७५० मुलांना भेट दिली.**
**सचिन देसाई यांनी स्वत: लिहिलेल्या "बालकांचे वक्तृत्वविश्व" या भाषण संग्रहाच्या १,००० प्रती राज्यातील शिक्षक व मुलांना मोफत वाटल्या आहेत.**
**वाचन संस्कृती वाढविणारा, वक्तृत्वाची कला जोपासण्यासाठी तयारी करुन घेणारा, मायेच्या शाली अंगावर फाटके तुटके कपडे घालणाऱ्या गोरगरीब लोकांना वाटणारा, मुलांच्या शालेय पोषण आहारात ताजी भाजी मिळावी म्हणून लोकसहभागातून जमीन मिळवून लोकांकडूनच मशागत करून "माझी शाळा माझी परसबाग" उपक्रम घेणारा सचिन देसाई हा एक अवलिया आहे.**
**सचिनच्या सेवाभावी कार्यकर्तृत्वाला साष्टांग नमन. सचिनला व परिसरातील सर्व सदस्यांना आरोग्यदायी दीर्घायुष्य लाभू दे ही परमेश्वराचे चरणी मनोमन प्रार्थना!**
संपत गायकवाड (माजी सहायक शिक्षण संचालक)

8:18 am

🙏 8:44 am

मा. शिक्षण संचालक श्रीयुत संपत गायकवाड यांनी सोशल मिडियावर लिहलेली पोस्ट

- या नवोपक्रमाचा अनुकरणीय सहभाग घेणारे राज्यातील उपक्रमशील शिक्षक व शाळा यादी

( सदर उपक्रमाचा राज्यातील हजारो शाळांनी आदर्श घेत आहेत त्यातील काही निवडक नावे )

| उपक्रमशील शिक्षक नाव | शाळा | संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| Prashant kale | Mahalwadi | 9922410777 |
| Nivedita chandrakant Madiwal | Marathi Vidyamandir Rajapur | 9404421588 |
| श्री.नवनाथ विष्णु सांगळे | z.p.semi English school maneganv | 9921007089 |
| सौ.कांचन अरुण शिंगे. | कुमार वि.मं.दानोळी नं. 1 | 8007917177 |
| Sandhyarani pradip yevale | Z.p.school ,ghanvatmala (Bagani) | 7588627020 |
| Pravina maitre | Z P.Upper.Pri..School Kolona | 9552129895 |
| वाघडोळे राजकुमार बालाजी | chore | 9405820963 |
| SAYYAD ASMA | जि प प्रा शा राजेगाव | 9766478378 |
| CHANDMUBARAK | Z.p.p.s Mahadevnagar | 9404682138 |
| Chavan Arun Nagnath | Z.P.P.S.Ghansargaon | 9623483048 |
| वांगीकर अंजली माणिकराव | ZPPS राजपिंपरी | 9011559066 |
| Manohar Akhare | Z.p.school Khirpuri Khurd | 9011785157 |
| Vaishali Ganpat Sonawane | Z.P.School Vinchur | 9890449115 |
| कांचन शिवाजी सनगर | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धनवडेवाडी | 8788420147 |
| Archana Pramod Korane | Vidya Mandir Mahadikwadi | 9921186604 |
| Ashwini Ravindra Bhalekar | V.M.Akurde | 9404990640 |
| Ashwini Rajendra Shinde | Vidya Mandir Donvade | 9763084635 |
| Marathi Ramdas Ratbod | Z P Upper pri.School Pipri | 9970614973 |
| Ku. Meenakshi Girdharrao | Z. P. Primary school Bopapur | 8788225655 |
| Ganvir Rajendra | (dighi) | 9423246143 |
| Shendage Sandip Krishna | Kanya vidya mandir vasagade | 9923936116 |
| पठाण एन. जी. | जि. प. प्रा. शा. दहिफळ भों. पश्चिम ता. | 8379909499 |
| Anupama bhujangrao petkar | परतूर | 9403935966 |
| Ganesh Namdev kare | Z.p.upper primary school chanki | ८७७९०७०६९१ |
| Sujata Ravindra Borude | Vidya mandir kondigre .Tal shirol | 9421767520 |
| राजश्री सुधाकर माने | Z.pp school Kaudgav | 9822762272 |
| JAIPRAKASH MADHAVRAO | जिल्हा परिषद शाळा नंबर २ आकिवाट | 9421143497 |
| Eknath Patil | v.m.tambale | 7875293476 |
| Kallappa sidram pujari | Kumar v. M. Dattwad | 9881412421 |
| कृष्णा अशोक शिलवंत | विद्या मंदिर अनफवाडी जि. कोल्हापूर | 9420948648 |
| ज्योती संतोष उतेकर | लंगडी | 9404395080 |
| सुनिता श्रीधर ढालपे | जि प शाळा हनुमंतवाडी (सोमंथळी | 9370027601 |
| शैलजा मच्छिंद्रनाथ सरोदे | )तालुका - फलटण | 9860660524 |
| Jayendra Ganpat Chavan | पिंपळगाव माळवी | 9881022057 |
| Pallavi Pravas Gatkal | ZPPS Shirgaon Kondoshi | 7385300742 |
| संभाजी बाबूराव खामकर | Z.P.P.SCHOOL | 9922665846 |
| दमयंती शिवाजी ठोके | NARODEVASTI(PATHRE BU) | 7843081146 |
| विवेक पुरूषोत्तम पाटील | latur | 9881022057 |

- या नवोपक्रमाचा अनुकरणीय सहभाग घेणारे <u>राज्यातील उपक्रमशील शिक्षक व शाळा यादी</u>

( सदर उपक्रमाचा राज्यातील हजारो शाळांनी आदर्श घेत आहेत त्यातील काही निवडक नावे )


| उपक्रमशील शिक्षक नाव | शाळा | संपर्क क्रमांक |
|---|---|---|
| कविता विनायक चौगले | विद्या मंदिर सोनाळी | ९४२१३६६१३८ |
| मनिषा मनोहर गामणे | Z.P.P.SCHOOL | 8286979980 |
| Pallavi Pravas Gatkal | NARODEVASTI(PATHRE BU) | 9370027601 |
| ज्ञानदेव विठ्ठल भोसले | चाफवली नं.१ | 9763138142 |
| संजय बाबुराव नांगरे | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ओंडोशी | 9923174411 |
| Sandip Shivaji Mahekar | Vidya Mandir Vikaswadi Savarde | 9923776907 |
| शैलजा मच्छिंद्रनाथ सरोदे | Bull | 9420948648 |
| Gaikwad Dilip Ganpat | पिंपळगाव माळवी | 9730574872 |
| Samadhan Namdev Pawar | Sant tukaramnagar | 9922189974 |
| संभाजी बाबूराव खामकर | Z P Pri School Vanasgaon Tal | 9860660524 |
| विनोदकुमार भोंग | म.न.पा.शाळा कोल्हापूर | ८३२९८७६३९३ |
| धनश्री शितल यलगुडे | कन्या वि.मं. मुरगूड. ता.कागल.. | 7741006679 |
| सौ.कांचन अरुण शिंगे. | जि. प. प्रा. शा. दहिफळ भों. पश्चिम ता. | 8007917177 |
| श्री.अंकुश सदाशिव माने | परतूर | 8975966624 |
| अश्विनसिंग अंगदसिंग राजपूत | कुमार विद्या मंदिर तेरवाड | 9850513258 |
| नरवाडे बाजीराव विश्वनाथ | कुमार वि.मं.दानोळी नं. 1 | ९४२२९३८१५५ |
| Joyce Florian Dsouza | विद्या मंदिर बेलवळे बु।। ता.कागल जि. | 9028242338 |
| श्री .प्रदीप विठ्ठल नाळे | कोल्हापूर | 9404114869 |
| Altab Bashir Bagwan | जि. प.प्रा. शाळा नानेगाव | 9594983611 |
| HIDAYAT MULLA | जि.प.के.प्रा.शा.पानकनेरगाव | 7385300742 |
| जयप्रकाश हरिदास कांबळे | St.peter church marathi pratmik | 9850586060 |
| सौ अलका रमेश ढवळे | shala Arnala | 9764669444 |
| Manoj Shivajirao Kamble | श्री महालक्ष्मी वि.मं.कोकिसरे | 9665438005 |
| Shendage Sandip Krishna | ZPP SCHOOL | 8788225655 |
| Sarjerao Dhulappa Patil | NANDURVIHIRE | 9158337834 |
| रमेश महाडीक | जि प शाळा मालदन | 7798727330 |
| Manisha Laxman Nerkar | URDU SCHOOL NO 57 | 9011289522 |
| JAIPRAKASH MADHAVRAO | ICHALKARANJI | 9421767520 |
| नलिनी बागुल | जिल्हा परिषद शाळा नासिक | 8208554510 |
| ज्योती भिमाशंकर चौंडे | जिल्हा परिषद प्राथमिक शाळा किरपे. | 9623699583 |
| Ranjana Mallikarjun Hasure | तालुका कराड | 9421366138 |
| सौ .sandhya vaskar | v.m.shengoan | 7083997086 |
| अजित प्रभाकर संगवे | Kanya vidya mandir vasagade | 9881412421 |
| सुनिता श्रीधर ढालपे | Kumar v m kacbha Thane | 8007876674 |
| RAJU MAHADEV NANNORE | Z.P . School Somthandesh | 7588561176 |
| संजय बाबूराव चोथे | Z.P.H.S. SAHAPUR TQ. | 9021418318 |

# ❑ ७. समारोप

सन 2022-23 या शैक्षणिक वर्षात 'लक्षात ठेव मुला हुशार व्हायचंय तुला !' हा प्रज्ञा विकसन विशेष नवोपक्रम म्हणजे मुलांच्या संपूर्ण पायाभूत व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक प्रयत्नांचा व उपक्रमांचा एक सुंदर मिलाफ होता. **वर्गातील १८ मुलांच्यासाठी राबवलेला हा उपक्रम त्याच्या यशस्वीतेमुळे राज्यातील अनेक उपक्रमशील शाळांनी देखील स्वीकारला. यातील अनेक कृती-प्रकल्पांचे राज्यभर अनुकरण करण्यात आले. मला आनंद वाटतो की, सदर उपक्रम माझ्या शाळेतील मुलांच्या पुरता मर्यादित न राहता राज्यातील हजारो मुलांना याचा लाभ झाला.**

वास्तविकपणे पाहता प्रत्येक मूल हे असामान्य असते. प्रत्येकाची प्रतिभा आणि हुशारी विभिन्न क्षेत्रात असते. प्रत्येक मूल जसे स्वतःला समजत असते तसेच ते वागत असते, यासाठी इतरांचा त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन नेहमी सकारात्मक असला पाहिजे. "तुला काहीच अक्कल नाही" "अरे गाढवा ! तुझ्या डोक्यात कसं शिरत नाही !" " तुला कितीही समजावले तरी तू कधीच शिकू शकणार नाहीस !" "तू काही कामाचा नाहीस !" अशी शिक्षक व पालक यांच्याकडून येणारी वाक्ये मुलांच्या विकासातील खरी गतिरोधक असतात. या उलट आपण मुलांचा कसाही प्रतिसाद असला तरी सकारात्मक बोलले, प्रेरणा दिली, प्रबलन दिले तर मुलांची कृती आणि प्रगती विकासाकडे वाटचाल करणारी ठरते. आपण लहान वयातील मुलांच्या माथ्यावर नकारात्मक दृष्टिकोनाचे मारलेले शिक्के मुलांची उमेद नष्ट करतात. एका उत्कृष्ट शिक्षकाची भूमिका नेहमी प्रेरक म्हणूनच असली पाहिजे. याशिवाय मुलांच्यात निसर्गतः शिकण्याची वृत्ती वाढीस लागेल अशी वातावरण निर्मिती देखील प्रत्येक शिक्षकाने सातत्याने करणे काळाची गरज आहे. या नवोपक्रमात मुलांच्या वयानरूप गरजा व निश्चित केलेली महत्त्वाची पाच उद्दिष्टे सतत डोळ्यासमोर ठेवून नवक्रमाची कार्यवाही केली. या प्रवासात शिक्षक व विद्यार्थी या दोघांनाही नवीन ज्ञान देणारा हा नवग्रह ठरला आहे. आनंदी शिक्षणाची व्याख्या काय असते ? याचा प्रत्यक्ष दाखला या अनुक्रमातून मिळाला. हा प्रेरणादायी शिक्षणाचा प्रवास सर्वांसाठी देखील प्रेरणादायक आहे, याची मला पूर्ण खात्री आहे. हा नवोपक्रम यशस्वी करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समिती, पालक, समाज व पर्यवेक्षक यंत्रणा यांचे योग्य सहकार्य मिळाले त्या सर्वांचे मी आभार मानत आहे. 'मुलांच्यात झालेला अपेक्षित वर्तन बदल' हीच उपक्रमाची खरी परिस्थिती आहे, असे मी मानतो. धन्यवाद !

**विद्यार्थी, शिक्षक, पालक व समाज यांच्यात सुयोग्य आंतरक्रिया साधून ध्येयप्राप्ती**



# ❑ ८. संदर्भ व परिशिष्टे

सदर उपक्रम राबवण्यापूर्वी तसेच राबवत असताना अनेक संदर्भ साहित्याचे वाचन केले ज्यामुळे मला नवोपक्रम राबवण्याची तसेच त्याच्या अहवाल लेखनाबाबत योग्य मार्गदर्शन व दिशा मिळाली. नवोपक्रम राबवताना कोणत्या पायऱ्यांनी जावे ? कोणती साधने वापरावीत ? कोणाकोणाची मदत घ्यावी ? अशा अनेक प्रश्नाची उकल झाली. माझा हा उपक्रम यशस्वीपणे राबवण्यासाठी खालील संदर्भ साहित्याचे मला मोलाचे योगदान लाभले.


- **राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०**
- **जीवन शिक्षण मासिक – राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे. ऑगस्ट २०२१ (FLN विशेष )**
- **शिक्षण संक्रमण मासिक- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळ, पुणे (जुलै २०२१)**
- **भारत सरकारच्या निपुण भारत विषयक मार्गदर्शक सूचना दि. १६/०७/२०२१.**
- **अध्ययन प्रक्रियेचे व्यवस्थापन मुलभूत संकल्पना - राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र,पुणे. नोव्हे २०२३**
- **मृदू कौशल्ये- प्रा. विजयकुमार वेदपाठक (फडके प्रकाशन ) मार्च २०२३**
- **मैत्री करूया गणिताशी**
- **व्यक्तिमत्व फुलवताना-माधुरी तळवलकर (डायमंड पब्लिकेशन २००९)**
- **मूल घडत कसं ? घडवा तुम्हाला हवं तसं ... - योगेश कोरे ( होम रिव्हाईज पब्लिकेशन्स )**
- **मुलांच्या बुद्धीमता विकसित करण्याच्या २१ पद्धती - मनोज अंबिके**
- **विद्याप्रवेश**
- **शिकू आनंदे मराठी**
- **मैत्री – लोकसत्ता वृत्तपत्र विशेष लेखमाला (सन २०२०)**
- **मेंदूचा पासवर्ड – डॉ. श्रुती पानसे**
- **उपक्रमशीलतेकडून कृतिशीलतेकडे – सिद्धराम माशाळे , अभिषेक प्रकाशन**
- **कृती संशोधन नवोपक्रम - स्वाती गाडगीळ, सुविचार प्रकाशन (२००६ )**
- **कृती संशोधन व नवोपक्रम – व. झा. साळी व सुरेश करंदीकर, फडके प्रकाशन , (२००६)**
- **दिशा नवोपक्रमाच्या -संपादक शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे. (२०१५)**
- **स्वअध्ययन साहित्य निर्मिती हस्तपुस्तिका १ ते ४**
- **नवोपक्रम प्रकल्प उपयोग , चित्रलेख प्रकाशन – डॉ. सुधाकर गायकवाड**
- **शिक्षा मे नवाचार – सुरेश शिंगणे, तन्मय प्रकाशन, , २०१४**
- **ध्यास गुणवत्तेचा शोध नवोपक्रमशीलतेचा - शामुकांत रुळे, प्रशांत पब्लिकेशन २०१६**

# परिशिष्ट - अ

## महत्वपूर्ण लिंक

**'लक्षात ठेव मुला हुशार व्हायचंय तुला '** या उपक्रमा संदर्भातील तपशीलवार माहिती व पुरावे आपणास खालील  लिंक यादीद्वारे सहजपणे दृष्टीक्षेपात येईल.

- **नवोपक्रमबाबत संपूर्ण माहिती  संदर्भ व्हिडिओ संग्रह  :**
- ➢ https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnyi_FDrMuhjyGLTulkSphYs

➢ **विद्यार्थी उपक्रम नमुने व पुरावे संग्रह (गुगल ड्राईव्ह) लिंक** :

https://drive.google.com/drive/folders/1RPnLIvAHR-nLr6KxsgJFfg2eFD5n4ARh?usp=sharing

- **कृती उपक्रम लिंक्स**

i. https://youtu.be/AWUGhiL5SPg?si=-KoRaJe-60QCARIp

ii. https://youtu.be/wyRQGICFLOY?si=viZ2a3IOg98A1SDf

iii. https://youtu.be/q__QwaerWjs?si=cGgYYW34e6q6oBYt

iv. https://youtu.be/1yT4d3ChYZk?si=AzLEDslnvIPA38QU

v. https://youtu.be/ZSJwrr3giT4

vi. https://youtu.be/LYKzjFXlea4?si=xRRxs8sVJ4XBuYkE

vii. https://youtu.be/LYKzjFXlea4?si=x9nypqvlGseMNKHk

viii. https://youtu.be/WsnVUGzGvHA?si=E5fdz4nNeUQYqYOV

ix. https://youtu.be/TTFMNBMDA78?si=UH1SW9IAEt5Gv1W0

x. https://youtu.be/JuzqbS7Xnv0?si=ecjZ6hOXs2BG-aSq

- **आम्ही छोटे संपादक उपक्रम**
- ➢ https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzqes9xFrt95c9WpnYedJHU

- **न्युट्रीशन गार्डन**
- ➢ https://youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnwmcj_f-3dZtDnI9o8_KmB0

- इतर उपक्रम:

https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnyi_FDrMuhjyGLTulkSphYs

- लोकसहभागातून शाळेचा  क्रांतिकारी शैक्षणिक विकास
- ➢ https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnxO74sFkMJYkRHIQxwky_Mq

# स्वनिर्मित ऑनलाईन पाठ व ऑनलाईन टेस्ट निर्मिती

| | |
|---|---|
| ऑनलाईन पाठ १ - व्हिडीओ लिंक<br>घटक : संख्याची दर्शनी व स्थानिक किंमत | https://youtu.be/Qkyb28fEjO8 |
| इयता ३ री - ऑनलाइन टेस्ट | https://forms.gle/xpgZfLyBvekPDNdGA |
| इयता ४ थी ऑनलाइन टेस्ट | https://forms.gle/7u9t2H3Ry9iWQA3z7 |

| | |
|---|---|
| ऑनलाईन पाठ -२<br>घटक : लिंग व त्याचे प्रकार | https://youtu.be/c-NohGI7Zbs |
| इयता २ री - ऑनलाइन टेस्ट | https://testmoz.com/q/3177646 |
| इयता ४ थी ऑनलाइन टेस्ट | https://forms.gle/F27TNLRZVZuQE8RV9 |

| | |
|---|---|
| ऑनलाईन पाठ ३ –<br>घटक : CONTRCTED FORM | https://youtu.be/NIuGr6SFFPc |
| इयता ३ री - ऑनलाइन टेस्ट | https://testmoz.com/q/3471170 |
| इयता ४ थी - ऑनलाइन टेस्ट | https://forms.gle/Utz9UfL4bv8FKFxX9 |

| | |
|---|---|
| ऑनलाईन पाठ -४ घटक : लहानात लहान व मोठ्यात मोठी संख्या तयार करणे | https://youtu.be/F6EfXH9Ie-Q |
| इयता ३ री - ऑनलाइन टेस्ट | https://testmoz.com/q/3733630 |
| इयता ४ थी - ऑनलाइन टेस्ट | ttps://forms.gle/9m5jsKUhpqTGMrjWA |

| | |
|---|---|
| ऑनलाईन पाठ - ५ घटक : विरामचिन्हे | https://youtu.be/fMAiNnPktAM |
| इयता ३ री - ऑनलाइन टेस्ट | https://testmoz.com/q/4103642 |
| इयता ४ थी - ऑनलाइन टेस्ट | https://forms.gle/XGZSA7iLmgFqtwUP9 |

| | |
|---|---|
| ऑनलाईन पाठ – ६ घटक : रांगेतील स्थान | https://youtu.be/vfuC2Odo2Ro |
| इयता ३ री - ऑनलाइन टेस्ट | https://testmoz.com/q/5523910 |
| इयता ४ थी & - ऑनलाइन टेस्ट | https://forms.gle/nukSePnUR7yTkxnj9 |

# परिशिष्ट - ब

मुलांच्या मूल्यमापनासाठी मुलाखत, कसोट्या व निरीक्षण पद्धती वापरण्यात आली. यामध्ये मुलांना काही प्रश्न विचारण्यात आले, काही सूचना देण्यात आल्या. या वापरलेल्या मूल्यमापन साधनातील काही नमुने खालीलप्रमाणे...

- **अ ) प्रश्नावली**

१ ) इंग्रजी शब्द वाचन करुन दाखव.

२ ) गणित व बुद्धिमत्ता मधील घटकावर आधारित प्रश्नावली सोडवा /दिलेली ऑनलाइन टेस्ट सोडवा.

३ ) तुमच्या परिसरात असणाऱ्या पिकांची नावे सांगा.

४ ) घरातील विविध धान्यादी मालाची नावे सांगा.

५ ) समानार्थी व विरुद्धार्थी यांच्या अचूक जोड्या लावा

६ ) दिलेल्या शब्द गटातील अशुद्ध शब्द ओळखा.

७ ) दिलेला कूट प्रश्न सोडवा.

८ ) खालील इंग्रजी शब्दाचा मराठी अर्थ ओळखा

९ ) मराठी शब्द संपत्तीवर आधारित प्रश्नांची अचूक उत्तरे निवडा व पर्यायाला गोल करा.

१० ) सामान्य ज्ञानावर आधारित प्रश्न विचारणे.

११ ) विशिष्ट अक्षरावरून सुरू होणारे इंग्रजी शब्द सांगा.

१२ ) घड्याळावरील शाब्दिक उदाहरणे सोडवा.

१३ ) वस्तूचा वापर करून भागाकार गणिते सोडवा.

१४ ) दिलेल्या वाक्यात विरामचिन्हे वापरून वाक्य पुन्हा लिहा.

१५ ) दिलेल्या वाक्यात अधोरेखित शब्दाच्या जागी समानार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा.

१६) म्हणी पूर्ण करा चित्रावरून म्हण ओळखा.

१७) प्रश्न  पेढीतील प्रश्न वाचून योग्य उत्तर निवडा.

१८) खाली दिलेला इंग्रजी उचारा वाचून दाखवा.

१९ ) अपूर्णांकावर आधारित शाब्दिक उदाहरणे सोडवणे

. ब ) **कृती व प्रात्यक्षिक**

१ ) तुमच्या परिसरातील रानभाजी घेऊन यावी व  त्याचा आपणास कोणता फायदा होतो ? याबाबत माहिती संग्रहित करा.

२ ) वस्तूचा वापर करून पाढा तयार करा.

३ ) आपल्या परिसरात घडलेल्या विशेष घटनांची माहिती गोळा करून आणा.

४ ) कागदाचे तुकडे जोडून आकार पूर्ण करा.

५ ) स्मार्ट बोर्ड वरील प्रश्न वाचून आपले उत्तर प्लिकर्स मधून स्कॅन करण्यासाठी कार्ड दर्शवा.

६ ) आपल्या पालकांच्या फोनवर पाठवलेली इंग्रजी वाचन ऐकून तुम्ही पुन्हा वाचन सराव करा.

७ ) आपल्या परिसरात असणारे किराणा दुकान, दूध संस्था, कापड दुकान येथे जाऊन परिमाणांच्या साधनांचा प्रत्यक्ष वापर करून पहा.

८ ) आरसा वापरून आकृतीवरील प्रश्न सोडवा.

९ ) सारणीचे निरीक्षण करून धान्यादी मालाचे वर्गीकरण करा व योग्य रकान्यात धान्य ठेवा

# नवोपक्रम सहभागी विद्यार्थी यादी

या नवोपक्रममध्ये शाळेतील इयत्ता 3 री व ४ थी च्या सर्व १८ विद्यार्थ्यांनी भाग घेतला. या नवोपक्रमाचा त्यांना सकारात्मक लाभ झाला त्यांची यादी खालीलप्रमाणे........

| अ. क्र. | विद्यार्थी नाव | इयत्ता |
|---|---|---|
| १ | पाटील साईराज सुनिल | |
| २ | पाटील कीर्ती पांडुरंग | ३ री |
| ३ | पोवार श्रेयश अनिल | ३ री |
| ४ | वांजोळे विराज विजय | ३ री |
| ५ | पोवार प्राजक्ता जनार्दन | ३ री |
| ६ | पोवार आयुष प्रकाश | ३ री |
| ७ | संकपाळ धनराज दीपक | ३ री |
| ८ | संकपाळ शुभम बबन | ३ री |
| ९ | गुरव ईश्वरी तानाजी | ३ री |
| १० | पाटील शिवम विश्वजीत | ३ री |
| ११ | भुतल भक्ती हरिश्चंद्र | ३ री |
| १२ | वांजोळे अथर्व दीपक | ३ री |
| १३ | आसावरी संतोष पाटील | ४ थी |
| १४ | अनुज अरविंद पाटील | ४ थी |
| १५ | हर्षवर्धन संजय गुरव | ४ थी |
| १६ | श्रेया गणपती देसाई | ४ थी |
| १७ | आदित्य आनंदराव देसाई | ४ थी |
| १८ | उर्वी विकास येरम | ४ थी |

# परिशिष्ट - क

## नवोपक्रम अंतर्गत इतर काही छोट्या महत्वाच्या कृती

या नवोपक्रम अंतर्गत महत्वाचे, सहज, सुलभ असे नावीन्यपूर्ण **आनंददायी शिक्षणाची प्रेरणा व जिज्ञासा निर्माण करणारी काही आव्हाने** देण्यात त्याबाबतची माहिती....

### आव्हान क्र. १

- **नाव : खेळातून बनू शब्द्श्रीमंत ! (पिल्लुदर्शक, घरदर्शक या शब्दसंपत्तीवर प्रभुत्व संपादन )**
- **साधने :** कार्डशीट पेपर, कागद, पीन, डींक, स्केचपेन
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१) मुलांचे दोन गट करणे व परस्पर समोर उभे करणे.

२) एका गटातील मुलांना विभिन्न प्राण्यांची नावे देणे व दुसऱ्या गटातील मुलांना निवडलेल्या प्राण्यांच्या पिल्लांची नावे देणे.

३) दिलेल्या प्राणीदर्शक व पिल्लुदर्शक नावाची स्टीकर बनवून त्यांच्या ड्रेस वर चिकटवणे.

४) प्राणी व पिल्लू त्यांच्या परस्पर समोर नसतील याचा विचार करून त्यांना विसंगत उभे करणे.

५) या नंतर पिल्लुदर्शक नावे मिळालेल्या मुलांना प्राणीदर्शक बनलेल्या मुलांचे ड्रेस वरील नेमप्लेट वाचून आपण कोणाचे पिल्लू आहेत हे विचार करण्यास सांगणे.

६) मुले आपल्या आपल्या जोड्या निश्चित करतील. शिक्षकांची सूचना मिळताच आपल्या आई बनलेल्या मुलग्याजवळ जातील. योग्य जोडी बनलेल्या मुलांचे अभिनंदन केले जाईल.


७) याच प्रमाणे घरदर्शक शब्दांची ओळख मनोरंजक पद्धतीने करून देता येईल.यासाठी शाळेच्या परिसरात वेगवेगळ्या ठिकाणी प्राण्यांच्या घराची नावे अगर चित्रे लावली जातील. व मुलांना प्राण्यांची भूमिका देऊन शिक्षक सूचना मिळताच आपल्या घराजवळ जाण्याबाबत सांगितले जाईल.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - घोकमपट्टीने मुलांचे भाषिक ज्ञान वाढवण्यापेक्षा कृतीयुक्त खेळातून मुले लक्षात ठेवतात.
  - शब्दसंपत्ती सहजपणे वाढते.
  - मुलांची निरीक्षणशक्ती व तार्किकशक्ती वाढते.
  - मुलांच्यामध्ये सहकार्यवृत्ती व स्नेहभाव वाटतो.
  - मुलांचे सामान्यज्ञान सहजपणे वाढवता येते.
  - आनंददायी पद्धतीमुळे मुलांची शिकण्यातील जिज्ञासा वाढते.
  - या पद्धतीवर आधारित मुले स्वतः खेळ तयार करून खेळतात.



- **लागणारा कालावधी : ३० मिनिटे**
- **व्हिडिओ लिंक :**

https://youtu.be/AWUGhiL5SPg?si=-KoRaJe-60QCARIp




## आव्हान क्र. २

- **नाव : NO BAD TOUCH ONLY GOOD TOUCH**
- **साधने :** एक्टीविटी कार्डस, हिरवा व लाल पेन, रंग, बटण, कात्री
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

1) मुलींना व मुलांनाही चागला व वाईट स्पर्श ही पहिली जाणीव करून देणे.
2) आवश्यक वाटल्यास यावर आधारित चित्रफित दाखवणे.
3) GOOD TOUCH व BAD TOUCH हे प्रात्यक्षिक स्वरुपात समजावून देण्यासाठी एक्टीविटी कार्डस तयार करून ते मुलांच्याकडून सोडवून घेणे.
4) यातील कार्ड्स किड्स बॉडी पिक्चर असेल त्यासमोर BAD TOUCH लाल रंगाने तर GOOD TOUCH हिरव्या रंगाने दर्शवण्यास सांगणे.
5) काही कार्ड कृतीवर आधारित असतील ज्यामध्ये मुलांना कोणती कृती योग्य व कोणती अयोग्य हे मार्क करून दाखवावे लागेल'
6) काही कागदी बॉडी मोडेल कात्रीने कट करून हिरव्या व लाल रंगाच्या पेनाच्या सह्यायाने पिक्चर बोर्डरवर कोणत्या भागावर कोणत्या रंगाचा पेन वापरायचा याचीही कृती करून घेता येईल.
7) मुलांना हा विषय कितीपत समजला याचे कसोटीच्या आधारे मुल्यांकन केले जाईल.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - छोट्या कृतीतून मुलांना हा संवेदनशील विषय सहजपणे समजेल.
  - शरीराला स्पर्श न करताही हा विषय मुलांना समजावता येईल.
  - कृतियुक्त सहभागातून मुलांना चांगले आकलन होईल.
  - मुलांना या जाणीवेतून शारीरिक शोषण बाबत जाणीव होईल.
  - मुलांना त्यांच्या समस्या बाबत मुक्तपणे बोलण्याचे धाडस वाढेल.
- **लागणारा कालावधी : १ तास**





# आव्हान क्र. ३

- **नाव : वर्ड चेन**
- **साधने :** कागदाचे कपटे, कात्री, डींक
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१) खराब कागद किंवा वर्गात कागदाचा कचरा यापासून मुलांना छोटे चौरस तुकडे तयार करणे.
२) सदर कागदावर इंग्रजी शब्द लिहून अंताक्षरी पद्धतीने पुढील शब्द लिहण्यास सांगणे.
३) सदर छोटे शब्द कार्ड शाळेतील रिकाम्या भिंतीवर चिकटवण्यास सांगणे.
४) कोणताही शब्द रिपीट होणार नाही याची विद्यार्थी काळजी घेतील.
५) शेवटच्या अक्षरावरून अर्थपूर्ण शब्द लिहून मुले पुढे चिकटवत चेन जोडत जातील.
६) रिकाम्या वेळी मुले ही शब्द साखळी वाढवत जातील.
७) जास्त शब्द जोडणाऱ्या मुलाचे अभिनंदन केले जाईल.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - मुलांच्या इंगजी शब्दसंपत्तीमध्ये वाढ होते.
  - विशिष्ट शब्दापासून तयार होणारे शब्द मुले लक्षात ठेवतील.
  - टाकाऊ वस्तूचा सुयोग्य वापर करण्याची वृत्ती वाढेल.
  - मुलांच्यामधील सृजनशीलतेचा विकास होईल.
  - आनंदी वातावरणात कृती खेळातून मुलांना इंगजी वाचनाची व शिकण्याची प्रेरणा मिळेल.

- **लागणारा कालावधी : १ आठवडा**



## आव्हान क्र. ४

- **नाव :** MAGIC CARDS वापरातून इंग्रजी समृद्धी
- **साहित्य :** कार्डशीट पेपर, कात्री, रिंग, डिंक, स्केचपेन
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१) अनेक इंग्रजी शब्द तयार होतील अशी कागदी कार्ड्स वापरून शिक्षक शैक्षणिक साधने तयार करतील.

२) कागद दुमडला असता नवनवीन शब्द कसे तयार होतात याचे शिक्षक प्रात्यक्षिक दाखवतात.

३) मुले त्याप्रमाणे साहित्य वापरून शब्द वाचन करून दाखवतात.

४) पट्टी सरकवून कसे सहजपणे शब्द तयार होतात याबाबतचे दुसऱ्या शैक्षणिक साधनाची शिक्षक प्रत्यक्ष ओळख करून देतात.

५) मुले देखील सदर साहित्य हाताळून शब्द तयार करून दाखवतात.

६) याप्रमाणे अंकवाचनाचा देखील शिक्षक रंजक पद्धतीने ओळख व वाचन सराव घेतात.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - शैक्षणिक साहित्य वापरण्याचे कौशल्य प्राप्त होते.
  - मुलांची शब्दसंपत्ती वाढवता येते.
  - मुलांची श्रवण क्षमता विकसित होते.
  - मुलांच्या इंग्रजी वाचनाचा वेग सुधारतो.
  - गणित मधील संख्याज्ञानाचा अगदी सहजपणे सराव होतो.
  - शिक्षकांच्या मदतीशिवायही मुले स्वतः अध्ययन करतात.
  - मुलांची निरीक्षण क्षमता वाढते.

- **लागणारा कालावधी : ३० मिनिटे तास**
- व्हिडिओ लिंक :

https://youtu.be/wyRQGICFLOY?si=viZ2a3IOg98A1SDf

## आव्हान क्र. ५

- **नाव : लेट्स प्ले पझल गेम**
- **साधने :** रंगीत कागद, कात्री, कार्ड्स, डिंक, गणित व मराठी साहित्य पेटी
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१) मुलांना आव्हान देण्यासाठी कागदाचा व इतर साहित्याचा वापर करून Puzzle गेम तयार केल्या जातात.

२) गेम बाबत सूचना व साहित्य मुलांना प्रदान केले जाईल.

३) मुले दिलेले आव्हान योग्य वेळेत पूर्ण करतील.

४) यानंतर मुलांचे दोन गट बनवले जातील.

५) एका गटाला आव्हान अथवा समस्या निर्माण करण्यास सांगितली जाईल तर दुसरा गट त्याचे उत्तर तयार करेल.

६) आव्हान पूर्ण करण्यास प्रत्येक गटास किती वेळ लागला यावरून त्यांची गुणवत्ता ठरवली जाईल.

७ ) यशस्वी मुलांचे व गटाचे अभिनंदन केले जाईल.

**कृतीतून होणारे फायदे -**

- मुलांना सूचना पालनाची सवय लागते
- मुलांची निरीक्षण क्षमता वाढते.
- सहयोग भावना वाढीस लागते.
- चिकित्सक विचार करण्याची सवय वाढते.
- गणित विषयाचा चांगला विकास होतो.
- मुलांना कृतियुक्त शिक्षणातून शिकण्याची प्रेरणा मिळते.

- **लागणारा कालावधी : ३० मिनिटे**
- ड्राईव्ह लिंक :

https://drive.google.com/drive/folders/1Mb6q8v4PugLdgLd6ereB3HFKFTDPCMWv?usp=sharing



## आव्हान क्र. ६

- **नाव : We are Smart News Reporter**
- **साधने** : News Banner Maker app, Recording Divice, क्रोमा इफ्फेक्ट कर्टन, etc
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१) मुलांना परिसरातील महत्वाच्या घडामोडींच्या नोंदी घेण्यास सांगणे.

२) वृत्तपत्रात वृत्तलेखन कसे केले जाते याची माहिती देणे.

३) News Banner Maker app च्या मदतीने बातमी लेखन कशा पद्धतीने केले जाते. याची माहिती देणे याचे प्रात्यक्षिक करून घेणे.

४) क्रोमा क्रोमा इफ्फेक्ट चा वापर करून मुलांच्या कडून काही विषयांच्या बाबतीत निवेदन करून घेणे. त्याचे रेकॉर्डिंग करून व्हिडिओ आवृत्तीत प्रदर्शित करणे.

५) मुलांनी तयार केलेल्या बातम्याचे प्रिंट काढून शालेय आवारात प्रदर्शित करणे.

६) शालेय परिपाठात मुलांच्याकडून याचे वाचन करून घेणे.

७) छोटय छोट्या विषयावर मुलाचे अनुभवपर लेख लिहून घेणे.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - मुलांना परिसरातील घडामोडींची माहिती ज्ञात होते.
  - मुलांच्या सामान्यज्ञानात भर पडते.
  - मुलाचा भाषिक विकास होतो.
  - २१ व्या शतकातील आवश्यक कौशल्ये विकसित होतात.
  - मुलांचे निवेदन कौशल्ये वाढते.
  - मुलांचा बोलण्यातील आत्मविश्वास वाढतो.
  - मुलांना तंत्रज्ञानाची आवड निर्माण होते.
- **लागणारा कालावधी : १ तास**
- व्हीडिओ लिंक :

https://www.youtube.com/playlist?list=PLN3xUBt2onnzqes






**शैक्षणिक वार्तापत्र**

भुदरगड ग्रामीण

10-10-2023, कोल्हापूर ,शैक्षणिक विशेष

**मिणचे खुर्द शिक्षण मंचच्या वतीने 'संध्या अभ्यासिका' अभिनव उपक्रमास सुरुवात.**

गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे यांच्या शुभहस्ते उद्घाटन सोहळा संपन्न

शैक्षणिक व पुरोगामी विचारांचा वसा आणि वारसा असणाऱ्या मिणचे खुर्द या गावात आज एका नवीन शैक्षणिक उपक्रमाची सुरुवात 'मिणचे खुर्द शिक्षण मंच' च्या वतीने करण्यात आली. मोबाईल व दूरदर्शन यांची वाढती व्यसनाधीनता ही एक काळाची समस्या बनली आहे, यावर उपाययोजना म्हणून शैक्षणिक व सामाजिक कार्य करणाऱ्या या नुतन मंचच्या वतीने गावातील विद्यार्थ्यांच्यासाठी संध्या अभ्यासिका सुरू केली आहे. या शिक्षण मंचातील प्रमुख सदस्य व सेवानिवृत्त मुख्याद्यापक सर्जेराव देसाई सर पर्यवेक्षक म्हणून भूमिका पाहणार आहेत. तसेच मंचातील इतर शिक्षक सदस्य सुद्धा यासाठी सहकार्य करणार आहेत. रोज सायंकाळी सहा ते आठ या वेळेत मुलांच्यासाठी ही अभ्यासिका सुरू राहणार आहे. सदर अभ्यासिका ही मुलांच्यासाठी ऐच्छिक आहे. या काळात अभ्यासासाठी योग्य वातावरण उपलब्ध करून देणे, आवश्यक तेथे मार्गदर्शन करणे, आवश्यक सोई सुविधा व गरजांची पूर्तता करणे आदी गोष्टी शिक्षणमंचच्या वतीने पुरवल्या जाणार आहेत. या अभिनव अभ्यासिकेचे उद्धाटन भुदरगडचे गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी बी एम कासार, मा.जि.प.सदस्य आर व्ही देसाई, सभापती आक्काताई नलवडे, शिक्षण मंचचे अध्यक्ष डी.एस.देसाई, सरपंच जयश्री खेगडे, उपसरपंच मनीषा नलवडे, मुख्याद्यापक एस डी देसाई, मुख्याध्यापक हिंदुराव खाडे, पत्रकार डी वाय देसाई, गावातील प्रतिष्ठित नागरिक, शिक्षण प्रेमी, गावातील शिक्षक व विद्यार्थी आदी. उपस्थित होते यावेळी सचिव सचिन देसाई यांनी आपल्या उपक्रमातून प्राप्त झालेल्या शैक्षणिक साहित्याचे वाटप मुलांना केले. कार्यक्रमाचे आभार श्री महावीर पाटील यांनी मांडले. या शिक्षण मंचामध्ये गावातील सर्व शिक्षक वृंद तसेच उच्चशिक्षित युवक आणि शिक्षणप्रेमी नागरिक सहभागी आहेत. पुढील काळात देखील या मंचच्या वतीने सर्वांना सहभागी करून गावात शैक्षणिक व सामाजिक उपक्रम राबवण्याचा निर्धार करण्यात आला.



NEWS BANER APP वर मुलांनी बनवलेली बातमी

## आव्हान क्र. ७

- **नाव : बकेट शो**
- **साधने :** प्लास्टिक बकेट, कार्ड्स, मार्कर
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१) प्रथम मुलांना इंग्रजी (आर्टिकल्स) उपपदे व त्यांचा वापर याची ओळख करून वाचन सराव घेणे

२) वर्गातील टेबलवर ३ रंगीत फायबर बकेट ठेवणे.

३) त्यावर अनुक्रमे **a, an व the** ही इंग्रजी आर्टिकल्स (उपपदे) लिहिणे.

४) काही इंग्रजी शब्दांचे कार्ड्स तयार करणे. (ball, Sun, apple etc.)

५) मुलांना शब्द कार्ड उचलून ती कोणाच्या डब्यात जातील या बाबत आव्हान देणे.
(ball हा शब्द कोणत्या डब्यात जाईल ? **a, an की the** च्या ते ओळखा )

६) या उदाहरणात मुले ball हा शब्द a च्या बकेट मध्ये टाकतील. असेच apple हे कार्ड an च्या बकेट मध्ये टाकतील टाकताना a ball, **an apple असा उच्चार ही करतील.**

१) याप्रमाणे वचन, लिंग, काळ यांचाही सराव घेता येईल.

- **कृतीतून होणारे फायदे -**

  - मनोरंजक खेळातून महत्वाचे घटक आवडीने शिकतात.
  - मुलांच्या मनातील गोंधळ कमी होतो.
  - मुलांची शब्दसंपत्ती वाढते.
  - Article सारखा नवीन घटक देखील मुले सहजपणे शिकतात.
  - मुलांच्यामध्ये तुलना करणे, चिकित्सक विचार करणे, सृजनशीलता या गुणांचा विकास होतो.
  - मुलांचे भाषिक कौशल्य सुधारते.

व्हिडिओ लिंक : https://youtu.be/JuzqbS7Xnv0?si=ecjZ6hOXs2BG-aSq






## आव्हान क्र. ८

- **नाव : स्टुडंड मिनी बँक (बचत उपक्रम)**
- **साधने :** रजिस्टर, छोटे लॉकर, ऑफीस साधने, इत्यादी.
- **शिक्षक-विद्यार्थी कृती /टप्पे :**

१) मुलांना बचतीचे महत्व समजावणे.
२) शाळेत मिनी बँक स्थापन करणे.
३) बँक चे कामकाज कसे चालते हे पाहण्यासाठी मुलांना प्रत्यक्ष बँक ची भेट घडवून आणणे.
४) मुलांच्यामध्ये क्लार्क, कॅशिअर व मेनेंजर अशी पदे तयार करणे.
५) मुलांचे जवळ शिल्लक राहिलेले पैसे जमा करण्यास सांगणे.
६) या शिवाय गरज लागेल तसे पैसे काढण्याची सूचना देण्यात येईल.
७) या सर्वांची नोंद पदावर असलेली मुले ठेवतील.
८) कोणाची बचत चांगली होते हे पहिले जाईल.
९) या सर्व आर्थिक व्यवहारावर शिक्षक लक्ष ठेवतील आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शन करतील.
१०) याप्रमाणे शाळेतील छोटे खर्च, छोट्या आर्थिक देणगीचा हिशेब आदी. जबाबदाऱ्या देणे त्याचे ऑडीट करून आवश्यक त्या सूचना देणे.

- **कृतीतून होणारे फायदे -**
  - मुलांना बँकेच्या कामकाजाचे स्वरूप सहजपणे समजेल.
  - मुलांना बचतीची सवय लागेल.
  - मुलांना गरजेच्या वेळी पैसे वापरता येईल.
  - मुलांच्यात सहयोग क्षमता वाढीस लागेल.
  - मुलांची पायाभूत आर्थिक साक्षरता निर्माण होईल.


पुरावे ड्राईव्ह लिंक :
https://drive.google.com/drive/folders/17XVCCQ2KfPDeOB1u7a2bVqQKWcyErfBx?usp=sharing



**दि. ६ डिसेंबर २०२३** रोजी **महाराष्ट्र राजभवन** या ठिकाणी शालेय शिक्षण विभाग यांचेकडून शासकीय उपक्रमांचे उद्घाटन प्रसंगी बशाचामोळा शाळेतील शैक्षणिक उपक्रमाचे सादरीकरण करण्यात आले. (याप्रसंगी राज्यपाल,मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व मंत्रिमंडळ शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.)



**यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई** च्या शिक्षण विभाग प्रसिद्धी फलकावर **शाळेतील या उपक्रमाचे फोटो आयकॉनिक स्वरुपात** निवडण्यात आले होते.



# 'वाचन प्रेरणा' उपक्रम सन 2023 स्पर्धेत शाळा कोल्हापूर विभागात प्रथम

## (2268 शाळामध्ये अव्वल येण्याचा मान )



परिषदेचे मुख्य कार्यकारी ... माध्यमिक ... कर्मचारी यांनी ...
संतोष पाटील, ...
शिक्षणाधिकारी एकनाथ आंबोकर,

विद्यामंदिर बशाचामोळा (ता. भुदरगड) येथील शिक्षक सचिन देसाई यांनी वृत्तपत्र वाटपाची सायकल आकर्षक व अभिनव पद्धतीने सजवून सर्वांचे लक्ष वेधून घेतले. या सायकलवरून 'पुढारी' अंकाचे वाटप करताना श्रृतिका भूतल.









पुढारी

# 'जागर स्वावलंबी शिक्षणाचा' सन्मान सोहळा उत्साहात

## दै. 'पुढारी'तर्फे आयोजन : बशाचा मोळा शाळेने पटकावला प्रथम क्रमांक ; रामसिना ग्रुप प्रायोजक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दै. 'पुढारी'तर्फे २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या 'जागर स्वावलंबी शिक्षणाचा' या उपक्रमांतर्गत वृत्तपत्र विक्रेता दिन तसेच वाचन प्रेरणा दिन अभिनव पद्धतीने राबवलेल्या शाळांचा शानदार सोहळ्यात सन्मान करण्यात आला. या उपक्रमात प्रथम क्रमांक भुदरगड तालुक्यातील विद्यामंदिर बशाचा मोळा या शाळेने पटकावला. शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागातील निलांबरी सभागृहात कार्यक्रम झाला. 'रामसिना'ग्रुप या कार्यक्रमाचे प्रायोजक होते.

रामसिना ग्रुपचे संचालक सचिन ओसवाल, महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षण मंडळाचे विभागीय सचिव डी. एस. पवार, शिवाजी विद्यापीठाच्या मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक, डॉ. शिवाजी जाधव, दै. 'पुढारी'चे वितरण सरव्यवस्थापक डॉ. सुनील लोंढे, शाहूवाडीचे गटशिक्षणाधिकारी विश्वास सुतार, भुदरगडचे गटशिक्षणाधिकारी दीपक मेंगाणे, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्रविक्रेता संघटनेचे सल्लागार शिवगोंडा खोत, महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे उपाध्यक्ष रघुनाथ कांबळे, महानगर वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष रवी लाड, महानगर वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे संघटक शंकर चेचर, महालक्ष्मी वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष केदार पाटील उपस्थित होते.

कोल्हापूर : दै. 'पुढारी'तर्फे आयोजित 'जागर स्वावलंबी शिक्षणाचा' उपक्रमातील विजेत्या शाळांचा सन्मान सोहळा झाला. याप्रसंगी रामसिना ग्रुपचे संचालक सचिन ओसवाल, दै. 'पुढारी'चे वितरण सरव्यवस्थापक डॉ. सुनील लोंढे यांच्यासोबत विजेत्या शाळांचे शिक्षक उपस्थित होते. (छाया : पप्पू अत्तार)

डी. एस. पवार म्हणाले, विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या सुप्त गुणांचा विकास करण्याची जबाबदारी शिक्षकांची असते. दै. 'पुढारी'तर्फे आयोजित 'जागर स्वावलंबी शिक्षणाचा' या उपक्रमाच्या माध्यमातून ही जबाबदारी अधिक सक्षमतेने पार पाडण्याची संधी शिक्षकांना मिळाली, असे प्रेरणादायी उपक्रम दै. 'पुढारी'ने राबवावेत.

सचिन ओसवाल म्हणाले, एका महान व्यक्तिमत्त्वाच्या नावाने सुरू केलेला उपक्रम, तसेच शिक्षकांच्या भूमिकेतून आम्हाला अपडेट ठेवणाऱ्या 'पुढारी'च्या या उपक्रमात सहभागी झाल्याचा आम्हाला आनंद वाटतो.

यावेळी शिवगोंडा खोत, रघुनाथ कांबळे यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. सुनील लोंढे यांनी उपक्रमाची माहिती दिली. वितरण व्यवस्थापक अमर पाटील यांनी सूत्रसंचालन व प्रास्ताविक केले. वितरण व्यवस्थापक शिवाजी पाटील यांनी आभार मानले.

सोहळ्यामधील सन्मानपत्र शाळांची नावे अशी : द्वितीय क्रमांक - सौ. शिलादेवी डी. शिंदे-सरकार हायस्कूल, कोल्हापूर, तृतीय क्रमांक- सह्याद्री विद्यालय हेरे, ता. चंदगड.

**उत्तेजनार्थ सन्मान मिळवलेल्या शाळा**

**कोल्हापूर शहर :** वीर कक्कया विद्यालय, प्रिन्सेस पद्माराजे विद्यालय, टाकाळा विद्यालय शाळा नं. ७२, बाळासाहेब खर्डेकर विद्यामंदिर, शाहू दयानंद प्राथमिक शाळा.

**भुदरगड तालुका :** विद्यामंदिर सोनाळी, विद्यामंदिर केळेवाडी, जवाहर बालभवन-गारगोटी, विद्यामंदिर अनफ बुद्रुक, शिवाजी विद्यालय महागाव, ता. गडहिंग्लज.

**कागल तालुका :** चिखली इंग्लिश मीडियम स्कूल, विद्यामंदिर सिद्धनेर्ली, राणी विजयादेवी गर्ल्स हायस्कूल कापशी (सेनापती), कन्या विद्यामंदिर सिद्धनेर्ली, विद्यामंदिर व्हनाळी, विद्यामंदिर माद्याळ.

**राधानगरी तालुका :** विद्यामंदिर केळोशी, किसनराव मोरे हायस्कूल, सरवडे, विद्यामंदिर आकनुर.

**करवीर तालुका :** विद्यामंदिर हणमंतवाडी, राजर्षी शाहू विद्यानिकेतन, विद्यामंदिर कांडगाव, विद्यामंदिर कंदलगाव, विद्यामंदिर कसबा बीड, दीपस्तंभ विद्यालय, दऱ्याचे वडगाव, विद्यामंदिर सावर्डे दुमाला.

**पन्हाळा तालुका :** चिले विद्यामंदिर पैजारवाडी, विद्यामंदिर माजगाव.

**शाहूवाडी तालुका :** निनाई विद्यामंदिर कारुंगळे, विद्यामंदिर गोटणे.

**गगनबावडा तालुका :** विद्यामंदिर धुंदवडे.

**इचलकरंजी शहर -** कुसुमताई प्राथमिक विद्यालय, बालाजी हायस्कूल, गंगामाई गर्ल्स हायस्कूल.

**हातकणंगले तालुका :** कबनूर केंद्रशाळा.

**शिरोळ तालुका :** पद्माराजे विद्यालय - शिरोळ, शिवाजी हायस्कूल सैनिक टाकळी.

### शनिवारी होणार 'जागर स्वावलंबी शिक्षणाचा'

थोर शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा १५ ऑक्टोबर हा जन्मदिवस देशभर वृत्तपत्र विक्रेतादिन साजरा केला जातो. या दिनाचे औचित्य साधून शनिवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी दै. 'पुढारी'तर्फे जिल्ह्यातील शाळांत 'जागर स्वावलंबी शिक्षणाचा' हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. डॉ. अब्दुल कलाम यांनी वृत्तपत्राचे वाटप करत शालेय शिक्षण घेतले. त्यांचा हा स्वावलंबी शिक्षणाचा वसा आणि वारसा विद्यार्थ्यांना थेट कृतीतून समजावा हा या उपक्रमाचा उद्देश आहे. या दिवशी शाळेतील एका विद्यार्थ्याने डॉ. कलाम यांची व्यक्तिरेखा साकारत 'पुढारी'चा अंक वाचकांपर्यंत पोहोच करायचा आहे. शिवाय गावातील वृत्तपत्र विक्रेत्याचा शाळेत सन्मान करून, वाचन प्रेरणा दिनानिमित्त शाळेत दै. 'पुढारी'चे वाचन करायचे आहे. हा उपक्रम उत्कृष्टरीत्या राबवणाऱ्या शाळांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात येणार आहे. या उपक्रमाचे फोटो आणि व्हिडीओ ९९७५४०१००९ या व्हॉटस्अ‍ॅप क्रमांकावर पाठवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सत्वजीवनचे नस्य पंचगव्य घृत
ऑनलाईन खरेदी करा..
अनिद्रा, घोरण्याची समस्या, डोके, नाक आदी संवेदनशील अवयवांचे कार्य सुरळीत करण्यासाठी

Kolhapur Edition
Oct 12, 2023 Page No. 9
newspaper.pudhari.co.in